महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९

**(दिनांक ३१ जुलै २००८ पर्यंत सुधारित)**

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००८

[किंमत : रु. १८ ]

# महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९

(दिनांक ३१ जुलै २००८ पर्यंत सुधारित)

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचा राज्यकारभार मराठी राजभाषेतून चालविण्याच्या धोरणानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ यांचे मराठीत भाषांतर या आधीही करण्यात आले होते.

इंग्रजी नियम आणि त्यांचे मराठीकरण यामध्ये सुसंबद्धता आणण्याच्या दृष्टीने काही क्लिष्ट व बोजड संज्ञा अधिक सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न याद्वारे पुन्हा एकदा करण्यात आला आहे.

भाषांतर करताना १९७९ नंतर दिनांक १२ ऑक्टोबर १९९० पर्यंतच्या अधिसूचनांद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांचा अंतर्भाव करण्यात आला होता. आता दिनांक ३१ जुलै २००८ पर्यंतच्या एकूण ९ (नऊ) अधिसूचनांद्वारे या नियमात करण्यात आलेल्या सुधारणांचा अंतर्भाव करण्यात आला आहे (शेवटची अधिसूचना दिनांक १८ जुलै २००८ ची आहे).

राज्य सरकारी कर्मचारी/अधिकारी यांना त्यांचे कर्तव्य पालन करताना, शिस्त व अपीलविषयक बाबी हाताळताना या सुधारित आवृत्तीचा अधिक उपयोग होईल अशी आशा आहे.

**जॉनी जोसेफ,**
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन.

मुंबई , दिनांक ४ डिसेंबर २००८.

# अनुक्रमणिका

## भाग एक—सर्वसाधारण


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ .. .. | १ |
| २. | अन्वयार्थ .. .. | १ |
| ३. | प्रयुक्ती .. .. | २ |


## भाग दोन—निलंबन


| | | |
|---|---|---|
| ४. | निलंबन .. .. | ३ |


## भाग तीन—शिक्षा आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरणे


| | | |
|---|---|---|
| ५. | शिक्षा .. .. | ५ |
| ६. | शिस्तभंगविषयक प्राधिकारी .. .. | ८ |
| ७. | कार्यवाही सुरू करणारा प्राधिकारी .. | ९ |


## भाग चार—शिक्षा करण्याबाबतची कार्यपद्धती


| | | |
|---|---|---|
| ८. | जबर शिक्षा करण्याबाबतची कार्यपद्धती .. .. | ९ |
| ९. | चौकशी अहवालावरील कार्यवाही.. .. .. | १७ |
| १०. | किरकोळ शिक्षा देण्याबाबतची कार्यपद्धती .. | १८ |
| ११. | कर्मचाऱ्यास आदेश कळविणे .. .. .. | १९ |
| १२. | एकत्रित कार्यवाही .. .. .. | १९ |
| १३. | विवक्षित प्रकरणांमध्ये विशेष कार्यपद्धती .. .. | २० |
| १४. | भारतामधील कोणतेही शासन, स्थानिक प्राधिकरण इत्यादींना ज्यांच्या सेवा उसन्या दिलेल्या असतील अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीतील तरतुदी. | २१ |
| १५. | भारतामधील कोणतेही शासन, स्थानिक प्राधिकरण इत्यादींकडून .. उसन्या घेतलेल्या अधिकाऱ्यांसंबंधी तरतुदी. .. .. | २२ |

## भाग पाच—अपीले


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १६. | ज्याविरुद्ध कोणतेही अपील करता येत नाही असे आदेश .. | २३ |
| १७. | ज्याविरुद्ध अपील करता येते असे आदेश .. .. | २३ |
| १८. | अपीलीय प्राधिकरणे .. .. .. | २४ |
| १९. | अपीलांकरिता कालमर्यादा .. .. .. | २६ |
| २०. | अपीलाची पद्धती, स्वरूप आणि आशय .. .. | २६ |
| २१. | अपीले सादर करणे .. .. .. | २६ |
| २२. | अपीले पुढे पाठविणे .. .. .. | २६ |
| २३. | अपीलावर विचारविनिमय .. .. .. | २७ |
| २४. | अपीलातील आदेशांची अंमलबजावणी .. .. | २८ |


## भाग सहा— पुनरीक्षण व पुनर्विलोकन


| | | |
|---|---|---|
| २५. | पुनरीक्षण .. .. .. | २८ |
| २५-अ. | पुनर्विलोकन .. .. .. | ३० |


## भाग सात—संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| २६. | आदेश, नोटीस इत्यादींची बजावणी .. .. | ३० |
| २७. | कालमर्यादा शिथिल करण्याचा आणि उशीर माफ करण्याचा अधिकार | ३० |
| २८. | आयोगाच्या सल्ल्याची प्रत पुरवणे .. .. | ३१ |
| २९. | निरसन आणि व्यावृत्ती .. .. | ३१ |
| ३०. | शंका निरसन .. .. .. | ३२ |
| | जोडपत्र .. .. .. | ३३ |

# सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

क्रमांक एमडीए-१०७८/आरएमसी.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाव्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

## भाग एक — सर्वसाधारण

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ**—(१) या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ असे म्हणता येईल.

(२) हे नियम १२ जुलै १९७९ पासून अंमलात येतील.

२. **अन्वयार्थ**.—या नियमांमध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर—

(अ) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात " नियुक्ती प्राधिकरण " याचा अर्थ—

(एक) शासकीय कर्मचारी त्यावेळी ज्या सेवेतील सदस्य असेल त्या सेवेमध्ये किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवेचा ज्या श्रेणीमध्ये त्यावेळेस समावेश केलेला असेल, त्या श्रेणीमध्ये नियुक्ती करण्यास सक्षम असणारे प्राधिकरण, किंवा

(दोन) शासकीय कर्मचारी जे पद त्यावेळी धारण करीत असेल त्या पदावर नियुक्ती करण्यास सक्षम असणारे प्राधिकरण, किंवा

(तीन) ज्या प्राधिकरणाने शासकीय कर्मचा-यांची नियुक्ती यथास्थिती, अशा सेवेत, श्रेणीमध्ये किंवा अशा पदांवर केली असेल ते प्राधिकरण, किंवा,

(चार) शासकीय कर्मचारी अन्य कोणत्याही सेवेचा स्थायी सदस्य असून किंवा अन्य कोणतेही स्थायी पद कायम धारण करीत असून शासनाच्या अखंड सेवेत असतो, अशा बाबतीत ज्या प्राधिकरणाने त्याची त्या सेवेमध्ये किंवा त्या सेवेतील कोणत्याही श्रेणीत किंवा त्या पदावर नियुक्ती केली असेल ते प्राधिकरण किंवा त्यापैकी जे अत्युच्च असेल ते प्राधिकरण असा आहे.

(ब) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे,

(क) " शिस्तभंगविषयक प्राधिकरण " याचा अर्थ शासकीय कर्मचा-याला, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करण्यास या नियमांनुसार सक्षम असणारे प्राधिकरण, असा आहे.

(ड) " विभाग प्रमुख " या शब्द प्रयोगाला मुंबई नागरी सेवा, नियम, १९५९ च्या नियम ९ च्या खंड (२३) मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल,

(ई) " कार्यालय प्रमुख " याचा अर्थ मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या नियम, २ च्या खंड (दहा) (अ ) अन्वये कार्यालय प्रमुख म्हणून जाहीर केलेला प्राधिकारी असा आहे,

(फ) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन, असा आहे,

(ग) " शासकीय कर्मचारी " याचा अर्थ ---

(एक) कोणत्याही नागरी सेवेत किंवा राज्य व्यवहाराशी संबधित असलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती असा असून त्यामध्ये, ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा भारतातील अन्य कोणत्याही शासनाकडे किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून नियंत्रित केल्या जाणा-या कंपनीकडे किंवा महामंडळाकडे अथवा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाकडे तात्पुरत्या सुपूर्द केलेल्या आहेत अशा, शासकीय कर्मचाऱ्याचा मग त्याचे वेतन राज्याच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असेल, त्यांचा समावेश होतो.

(दोन) जी व्यक्ती भारतातील अन्य कोणत्याही शासनाच्या सेवेतील सदस्य आहे किंवा त्या शासनाचे नागरी पद धारण करीत आहे आणि जिची सेवा तात्पुरती शासनाकडे सुपूर्द केली आहे, अशी व्यक्ती किंवा ---

(तीन) जी व्यक्ती स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या सेवेत आहे, आणि जिची सेवा तात्पुरती शासनाकडे सुपूर्द केली आहे, अशी व्यक्ती असा आहे.

(ह) " विधी व्यवसायी " याचा अर्थ, अधिवक्ता वकील किंवा, कोणत्याही उच्च न्यायालयाच्या न्याय प्रतिनिधी मुखता किंवा महसूल अभिकर्ता (एजंट) असा आहे.

#(आय) " जबर शिक्षा " याचा अर्थ नियम ५ च्या पोट-नियम (१) च्या बाबी (सात) ते (नऊ) (दोन्ही धरून) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, असा आहे.

#(जे) " किरकोळ शिक्षा " याचा अर्थ नियम ५ च्या पोट-नियम (१) च्या बाबी (एक) ते (सहा) (दोन्ही धरून) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, असा आहे.

(के) " प्रादेशिक विभाग प्रमुख " याचा अर्थ, या नियमांना जोडलेल्या परिशिष्टामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणताही अधिकारी, असा आहे.

(ल) " सेवा " याचा अर्थ, राज्याची नागरी सेवा, असा आहे.

(म) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

३. **प्रयुक्ती** :- (१) या नियमांद्वारे किंवा या नियमान्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त हे नियम, जो शासकीय कर्मचारी—

(अ) अखिल भारतीय सेवेतील कोणताही सदस्य,

(ब) शासनाच्या नैमित्तिक सेवेतील व्यक्ती,

---

# शासन अधिसूचना क्र.सीडीआर.१००५/प्र.क्र.२४/०५/अकरा, दिनांक २९ डिसेंबर २००६ द्वारे ही सुधारणा करण्यात आली.

(क) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम २ मधील खंड (१६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे पोलीस निरीक्षक , किंवा दुय्यम दर्जाच्या पदावरील पोलीस,

(ड) जिच्याकरिता या नियमांखाली समाविष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा कायद्यान्वये किंवा राज्यपालांनी केलेल्या किंवा राज्यपालांच्या पूर्वमान्यतेने केलेल्या कोणत्याही कराराद्वारे किंवा करारान्वये या नियमांच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर विशेष तरतूद करण्यात आलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती नसेल अशा प्रत्येक व्यक्तीला लागू होतील.

(२) पोट- नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्यपाल आदेशाद्वारे, या नियमांपैकी सर्व किंवा कोणत्याही नियमांच्या अंमलबजावणीतून कोणत्याही वर्गाच्या शासकीय कर्मचा-यांना वगळू शकतील.

(३) जर,----

(अ) कोणत्याही व्यक्तीला हे किंवा यापैकी कोणताही नियम लागू होतो किंवा कसे, अथवा

(ब) ज्या व्यक्तीला हे नियम लागू होतात अशी कोणतीही व्यक्ती विशिष्ट सेवेतील आहे किंवा कसे, याबाबत कोणताही संदेह उत्पन्न झाला तर ही बाब राज्यपालांकडे निर्देशित केली जाईल व राज्यपाल त्यावर निर्णय देतील.

## भाग-२----निलंबन

४. **निलंबन----**(१) नियुक्ती प्राधिकरण किंवा नियुक्ती प्राधिकरण ज्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आहे असे कोणतेही प्राधिकरण किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकरण किंवा राज्यपालांनी यासंबंधात सर्वसाधारण व विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेले अन्य कोणतेही प्राधिकरण, शासकीय कर्मचाऱ्याला----

(अ) ज्या बाबतीत त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे योजिले असेल किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल, किंवा,

(ब ) ज्या बाबतीत, तो कर्मचारी राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाधक ठरणाऱ्या कार्यामध्ये गुंतलेला आहे असे पूर्वोक्त प्राधिकरणाचे मत असेल, किंवा,

(क) ज्या बाबतीत त्याच्याविरुद्ध कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधात खटल्याचे अन्वेषण, चौकशी किंवा न्यायचौकशी चालू असेल, अशा बाबतीत निलंबनाधीन ठेवू शकेल.

परंतु नियुक्ती प्राधिकाऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिकाऱ्याने निलंबनाचा आदेश काढला असेल त्याबाबतीत अशा प्राधिकरणाने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती ते प्राधिकरण तत्काळ नियुक्ती प्राधिकाऱ्याला कळवील.

(२) शासकीय कर्मचाऱ्याला—

(अ) फौजदारी आरोपाखाली किंवा अन्यथा अटक करून ४८ तासाहून अधिक काळ पोलीस किंवा न्यायालयीन अभिरक्षेमध्ये ठेवले असेल तर, त्याला अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून,

(ब) तो सिद्धापराध ठरून त्याला ४८ तासांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा झाली असेल आणि अशा अपराध सिद्धीनंतर त्याला लगेच बडतर्फ केले नसेल किंवा सेवेतून काढून टाकले नसेल किंवा सक्तीने सेवेतून सेवानिवृत्त केले नसेल तर त्याच्या अपराध सिद्धीच्या दिनांकापासून नियुक्ती प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे निलंबनाधीन ठेवले असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण**—या पोट-नियमाच्या खंड (ब) मध्ये निदेशिलेला ४८ तासांचा कालावधी, अपराध सिद्धीनंतर कारावासाचा प्रारंभ झाल्यापासून मोजला जाईल आणि या प्रयोजनासाठी, मध्यंतरीच्या कारावासाचे कोणतेही कालावधी असल्यास तेही मोजले जातील.

(३) निलंबनाधीन शासकीय कर्मचाऱ्याला दिलेली बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शिक्षा अपिलामध्ये किंवा या नियमांखालील पुनरिक्षणामध्ये विचारात घेतलेली नसेल (बाजूस ठेवली असेल Set aside) आणि पुढील चौकशीसाठी किंवा कार्यवाहीसाठी किंवा अन्यथा कोणत्याही निदेशासह प्रकरण पुढे पाठविलेले असेल त्या बाबतीत, त्या कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आदेश, त्याच्या बडतर्फीच्या, सेवेतून काढून टाकण्याच्या, किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याच्या संबंधातील मूळ आदेश काढल्याच्या तारखेला आणि तेव्हापासून अंमलात असल्याचे मानले जाईल आणि पुढील आदेश देण्यात येईपर्यंत तो अंमलात राहील.

(४) शासकीय कर्मचाऱ्याला दिलेली बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शिक्षा न्यायालयाच्या निर्णयामुळे किंवा निर्णयाद्वारे रद्द करण्यात आली असेल/बाजूस ठेवली जात असेल किंवा अवैध असल्याचे जाहीर केले जात असेल किंवा अवैध ठरत असेल आणि शिस्तभंग-विषयक प्राधिकरणाने प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, मुळात ज्या आरोपावरून त्याला बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याची शिक्षा देण्यात आली होती, त्या आरोपाबाबत पुढील चौकशी करण्याचा निर्णय घेतला असेल त्या बाबतीत, नियुक्ती प्राधिकरणाने काढलेल्या बडतर्फीच्या, सेवेतून काढून टाकण्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याच्या मूळ आदेशाच्या तारखेपासून शासकीय कर्मचारी निलंबनाधीम असल्याचे मानले जाईल, आणि पुढील आदेश देण्यात येईपर्यंत तो निलंबनाधीन असल्याचे चालू राहील.

*(" परंतु, ते प्रकरण गुणवत्तेनुसार न तपासता केवळ तांत्रिक बाबींवरून न्यायालयाने आदेश दिलेला असेल त्याबाबतीत, तांत्रिक बाब पूर्ण केल्याखेरीज अशी पुढील चौकशी करण्याचा आदेश देण्यात येणार नाही.")

(५) (अ) या नियमान्वये, दिलेला किंवा देण्यात आला असल्याचे मानलेला निलंबनाचा आदेश, त्यात बदल करण्यास किंवा तो रद्द करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकरणाकडून तसे करण्यात येईपर्यंत अंमलात राहील.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याला निलंबित केले असेल किंवा ते निलंबित करण्यात आल्याचे मानले जात असेल (मग ते निलंबन शिस्तभंगविषयक कार्यवाहीच्या संबंधात असो किंवा अन्यथा असो) आणि ते निलंबन चालू असताना त्याच्याविरूद्ध अन्य कोणतीही शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तेव्हा, त्याला निलंबनाधीन ठेवण्यास सक्षम असणारे प्राधिकरण त्या संबंधातील कारणे लेखी नमूद करून अशा सर्व किंवा अशी कोणतीही कार्यवाही संपेपर्यंत, असा शासकीय कर्मचारी निलंबनाधीनच राहील असा निदेश देईल.

(क) या नियमान्वये दिलेला किंवा देण्यात आला असल्याचे मानलेला निलंबनाचा आदेश ज्या प्राधिकरणाने दिला असेल किंवा ज्या प्राधिकरणाकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल त्या प्राधिकरणाला किंवा असे प्राधिकरण ज्याच्या नियंत्रणाखाली असेल अशा प्राधिकरणाला त्या आदेशात फेरबदल करता येतील किंवा तो रद्द करता येईल.

## भाग तीन—शिक्षा आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरणे

५. **शिक्षा**—(१) त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाधा न आणता, शासकीय कर्मचाऱ्याला वाजवी व पुरेशा कारणांकरिता आणि यात या नंतर तरतूद केल्याप्रमाणे पुढील शिक्षा करता येतील, त्या शिक्षा अशा :—

**किरकोळ स्वरूपाच्या शिक्षा**—

(एक) ठपका ठेवणे,

(दोन) त्याची पदोन्नती रोखून ठेवणे,

(तीन) कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने आदेशांचा भंग केल्यामुळे शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरूपाच्या हानीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग त्याच्या वेतनामधून वसूल करणे,

---

*अधिसूचना क्रमांक सीडीआर. ११८८/१५८२/सीआर ८/८८/११, दि.१२ ऑक्टोबर १९९० अनुसार हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(चार) वेतनवाढी रोखून ठेवणे.

@ (पाच) विनिर्दिष्ट कालावधीकरिता वेतन समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणण्यात येईल आणि अशा पदावनतीच्या काळात शासकीय कर्मचाऱ्याला वेतनवाढी मिळतील किंवा मिळणार नाहीत याबाबत आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पदावनतीच्या परिणामी त्याच्या भावी वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील किंवा नाही याबाबतही निदेश दिले जातील.

(सहा) शासकीय कर्मचाऱ्यास तो ज्या वेतन समयश्रेणींमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये आणणे. ज्या वेतन समयश्रेणीतून, पदावरून श्रेणीमधून किंवा सेवेतून शासकीय कर्मचाऱ्यास असे अवनत करण्यात आले असेल त्या वेतन समयश्रेणीमधील, पदावरील, श्रेणीमधील किंवा सेवेतील बढतीस अशी अवनती सर्वसाधारणपणे रोधक ठरेल, मग अशा आदेशांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यास पूर्वीच्या वेतन समयश्रेणीत, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये परत आणण्यासंबंधीच्या अटी, शासकीय कर्मचाऱ्याची ज्येष्ठता व त्याचे वेतन यासंबंधीच्या निदेशांचा उल्लेख केलेला असो वा नसो.

**@ जबर शिक्षा—**

(सात) सक्तीची सेवानिवृत्ती.

(आठ) सेवेतून काढून टाकणे, मात्र भावी काळात शासकीय नोकरी मिळण्याच्या दृष्टीने ही अनर्हता ठरणार नाही.

(नऊ) सेवेतून बडतर्फ करणे, मात्र भावी काळात शासकीय नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनर्हता ठरेल.

(" परंतु, कोणतेही शासकीय काम करण्याबद्दल किंवा ते काम करण्यापासून परावृत्त करण्याबद्दल कायदेशीर परिश्रमिकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडून लालूच किंवा बक्षिस म्हणून कोणतेही इनाम स्वीकारल्याचा आरोप सिद्ध झाला असेल अशा प्रत्येक प्रकरणात खंड (आठ) किंवा (नऊ) मध्ये नमूद केलेली शिक्षा देण्यात येईल.

परंतु, आणखी असे की कोणत्याही अपवादात्मक प्रकरणात आणि लेखी नमूद करण्यात आलेल्या विशेष कारणांसाठी इतर कोणतीही शिक्षा देण्यात येईल ".)

---

@ शासन अधिसूचना क्रमांक सीडीआर.१०९७/प्र.क्र.३२/९७/अकरा, दिनांक ५ फेब्रुवारी १९९८ द्वारे सुधारणा करण्यात आली.

@ **स्पष्टीकरण**----या नियमांच्या अर्थांतर्गत पुढील गोष्टी या शिक्षा ठरणार नाहीत, त्या अशा----

(एक) शासकीय कर्मचारी ज्या सेवेत असेल ती सेवा किंवा तो धारण करीत असलेले पद ज्या नियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे विनियमित केले जात असेल त्या नियमांनुसार व आदेशानुसार किंवा त्याच्या नियुक्तीच्या शर्तीनुसार कोणतीही विभागीय परीक्षा (किंवा हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा) उत्तीर्ण न झाल्याबद्दल वेतनवाढी रोखून ठेवणे.

(दोन) शासकीय कर्मचारी दक्षतारोध पार करण्यास अयोग्य असल्याच्या कारणास्तव वेतन समयश्रेणीतील दक्षतारोधावर त्याची वेतनवाढ थांबवणे.

(तीन) शासकीय कर्मचाऱ्याच्या प्रकरणाचा विचार केल्यानंतर तो त्याच्या वर्तणुकीशी संबंधित नसणाऱ्या प्रशासकीय बाबींच्या आधारे ज्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर बढती मिळवण्यास पात्र ठरला असता त्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर मग ती बढती कायम किंवा स्थानापन्न असो बढती न देणे ;

(चार) उच्चसेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न या नात्याने काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला, तो अशा उच्चसेवेत, श्रेणीत किंवा पदावर काम करण्यास अयोग्य आहे. या कारणावरून किंवा त्याच्या वर्तणुकीशी संबंधित नसणाऱ्या कोणत्याही प्रशासकीय कारणावरून निम्न सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे.

(पाच) अन्य कोणत्याही सेवेत, श्रेणीत किंवा पदावर परिविक्षाधीन नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्या नियुक्तीच्या अटींनुसार किंवा अशा परिविक्षेचे नियंत्रण करणारे नियम व आदेश यानुसार परिविक्षाकाळामध्ये किंवा परिविक्षाकाळाच्या अखेरीस त्याच्या कायम सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे.

(सहा) भारतातील कोणत्याही शासनाकडून किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्राधिकरणाकडून ज्याच्या सेवा उसन्या घेण्यात आल्या होत्या त्या शासनाकडे किंवा प्राधिकरणाकडे त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा सुपूर्द करून अन्य कर्मचाऱ्याच्या सेवा उपलब्ध करून घेणे.

(सात) शासकीय कर्मचाऱ्याचा नियतसेवावधी किंवा सेवानिवृत्ती या संबंधीच्या तरतूदीनुसार त्याला सक्तीने सेवानिवृत्त करणे.

(आठ) (अ) परिविक्षाधीन नियुक्ती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्याची सेवा, त्याच्या परिविक्षा-काळामध्ये किंवा त्याच्या अखेरीस, त्याच्या नियुक्तीच्या अटींनुसार किंवा अशा परिविक्षेचे नियंत्रण करणारे नियम व आदेश यानुसार समाप्त करणे, किंवा

---

@ शासन अधिसूचना क्रमांक सीडीआर.१०९७/प्र.क्र.३२/९७/अकरा, दिनांक ५ फेब्रुवारी १९९८ द्वारे सुधारणा करण्यात आली.

(ब) अस्थायी शासकीय कर्मचाऱ्याची सेवा, त्याच्या वर्तणुकीशी संबंधित नसलेल्या कारणावरून समाप्त करणे, किंवा

(क) करारानुसार नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची सेवा, अशा कराराच्या अटीनुसार समाप्त करणे,

(२) ज्याबाबतीत पोट-नियम (१) च्या बाब (पाच) किंवा (सहा) मध्ये उल्लेखिलेली शिक्षा शासकीय कर्मचाऱ्याला करण्यात येते अशा बाबतीत अशी शिक्षा करणारे प्राधिकरण ज्या कालावधीसाठी कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात आले असेल तो कालावधी पूर्ण होण्यापूर्वी कर्मचाऱ्याने रजेवर व्यतीत केलेला कोणताही मध्यंतरीचा कालावधी त्या पदावनतीच्या कालावधीमध्ये धरला जाणार नाही असे त्या शिक्षेच्या आदेशामध्ये स्पष्ट करील.

६. **शिस्तभंगविषयक प्राधिकारी**—(१) राज्यपाल, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला, नियम ५ (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील.

(२) पोट-नियम (१) च्या तरतुदींना बाधा न आणता, नियुक्ती प्राधिकरणे ज्यांची नियुक्ती करण्याचा त्यांना अधिकार आहे व जे त्यांच्या नियंत्रणाखाली आहेत अशा #गट 'क' व गट 'ड' च्या सेवेतील कर्मचाऱ्यांना नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील :

परंतु, कार्यालय प्रमुख, त्याच्या संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील #गट 'क' व गट 'ड' च्या शासकीय कर्मचाऱ्यांना किरकोळ शिक्षा करण्यासंबंधीच्या अधिकारांचा वापर करतील :

परंतु, आणखी असे की, विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख त्यांच्या संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्यसेवा (गट-ब) च्या शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधातच किरकोळ शिक्षा करण्यासंबंधीच्या अधिकारांचा वापर करतील.

*[परंतु असेही की, विभाग प्रमुख त्यांच्या संबंधित प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्यसेवा (गट 'अ') चे जे शासकीय कर्मचारी रुपये @(१०,६५०) पेक्षा अधिक नसलेल्या किमान वेतनश्रेणीतील वेतन घेत असतील अशाच शासकीय कर्मचाऱ्याच्या संबंधात किरकोळ शिक्षा करण्याच्या अधिकाराचा वापर करतील.]

(३) पोट-नियम (१) च्या तरतुदींना बाधा न आणता सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महाराष्ट्र अधिनियम, वीस) खालील रोजगार हमी योजना अमलात आणताना, राज्यसेवा गट 'अ' च्या वेतनश्रेणीतील किमान टप्पा @रु.१०,६५० किंवा त्यापेक्षा कमी

---

# हा मजकूर शासन अधिसूचना क्रमांकः सीडीआर-१००८/प्र.क्र. १७/०८/अकरा, दि.१८ जुलै २००८ अन्वये सुधारणा समाविष्ट करण्यात आल्या.

* हा मजकूर अधिसूचना क्रमांकः सीडीआर-११८५/२७७७/३/११, दि.१७ एप्रिल १९८६ द्वारे जादा दाखल करण्यात आला.

@ शासन अधिसूचमा क्र.सीडीआर-१००१/प्र.क्र.१३/०१/अकरा, दिनांक २९ ऑक्टोबर २००४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या आणि #राज्यसेवा गट 'ब'च्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात केवळ किरकोळ शिक्षा करण्याच्या अधिकाराचा वापर करतील आणि उक्त योजनेखाली काम करणाऱ्या #गट 'क' व गट 'ड'च्या सदस्यांच्या संबंधात नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करण्याच्या अधिकारांचासद्धा वापर करतील.

**७. कार्यवाही सुरू करणारा प्राधिकारी :—**(१) राज्यपालांना किंवा त्यांनी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकारी यास,—

(अ) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करता येईल ;

(ब) या नियमान्वये ज्या शासकीय कर्मचाऱ्याला नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यास जे शिस्तभंगविषयक प्राधिकरण सक्षम असेल, त्या शिस्तभंगविषयक प्राधिकरणास अशा कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्याचा निदेश देता येईल.

# # (क) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने नियम ८ च्या पोट-नियम २ अन्वये नियुक्त केलेल्या चौकशी प्राधिकरणाकडील प्रलंबित चौकशी प्रकरण, वेळेवर पूर्ण करणे आवश्यक आहे. ह्याबाबत त्याचे समाधान झाले असेल, तर असे प्रलंबित चौकशी प्रकरण, इतर कोणत्याही चौकशी प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचे निदेश देऊ शकेल.

(२) ज्या शासकीय कर्मचाऱ्यास नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करण्यास सक्षम असणारे शिस्तभंगविषयक प्राधिकरण अशा कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करू शकेल.

## भाग चार- शिक्षा करण्याबाबतची कार्यपद्धती.

**८. जबर शिक्षा करण्याबाबतची कार्यपद्धती :—**

(१) शक्य असेल तेथवर, या नियमामध्ये आणि नियम ९ मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय, किंवा ज्याबाबतीत अशी चौकशी लोकसेवक (चौकशी) अधिनियम, १८५० (१८५० चा ३७) अन्वये केली जाते, त्याबाबतीत त्या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय, कोणतीही जबर शिक्षा ठोठावणारा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध केलेल्या, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या कोणत्याही आरोपाच्या खरेपणाची चौकशी करण्यास पुरेसा आधार आहे असे जेव्हा शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल तेव्हा त्या आरोपाचा खरेपणा पडताळण्यासाठी ते प्राधिकरण स्वत: चौकशी करू शकेल किंवा तसे

---

# हा मजकूर शासन अधिसूचना क्र. सीडीआर.१००८/प्र.क्र.१७/०८/अकरा, दिनांक १८ जुलै २००८ अन्वये सुधारणा करण्यात आल्या.

# #शासन अधिसूचना क्र. सीडीआर.१०९७/प्र.क्र.१०/९७/अकरा, दिनांक ६ फेब्रुवारी १९९८ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

करण्यासाठी यथास्थिती, या नियमान्वये किंवा लोकसेवक (चौकशी) अधिनियम, १८५० च्या तरतुदींन्वये एखाद्या प्राधिकरणाची नियुक्ती करू शकेल.

**स्पष्टीकरण :**—शिस्तभंगविषयक प्राधिकरण या नियमान्वये स्वत: चौकशी करीत असेल त्याबाबतीत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या नियमामध्ये चौकशी प्राधिकरणाचा केलेला कोणताही उल्लेख, हा शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचा उल्लेख आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

(३) या नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या प्रकरणी शिस्तभंगविषयक प्राधिकरण स्वत: पुढील गोष्टींचा मसुदा तयार करील किंवा करवून घेईल.

(एक) गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचा सारांश तयार करून दोषारोपाच्या बाबी निश्चित व सुस्पष्ट स्वरूपात मांडणे.

(दोन) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या पृष्ट्यर्थ गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन यासंबंधीच्या आरोपांचे विवरणपत्र तयार करणे, त्यात—

(अ) शासकीय कर्मचाऱ्याने दिलेली कोणतीही कबुली किंवा कबुलीजबाब यासह वस्तुस्थिती निदर्शक बाबींचे विवरण आणि,

(ब) ज्यांच्या आधारे दोषारोपाच्या बाबी सिद्ध करावयाचे योजिले असेल त्या कागदपत्रांची यादी आणि ज्यांनी साक्षी दिल्या असतील त्या साक्षीदारांची यादी, या गोष्टी समाविष्ट असतील.

(४) शिस्तभंगविषयक प्राधिकरण, शासकीय कर्मचाऱ्यांकडे त्यांच्या वरील दोषारोपाच्या बाबींची प्रत, गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र आणि ज्यांच्या आधारे दोषारोपाची प्रत्येक बाब सिद्ध करावयाचे योजिले असेल त्या कागदपत्रांची यादी व साक्षीदारांची यादी देईल किंवा देण्याची व्यवस्था करील आणि एका लेखी नोटिशीद्वारे व त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्याने आपले बचावाचे लेखी निवेदन आणि व्यक्तिश: निवेदन जबाब समक्ष सादर करण्याची त्याची इच्छा आहे किंवा कसे हे नमूद करावे असे त्यास फर्मावील.

(५) (अ) बचावाचे लेखी निवेदन मिळाल्यावर शिस्तभंगविषयक प्राधिकरण, दोषारोपांच्या ज्या बाबी कबूल केलेल्या नसतील अशा बाबींची जातीने चौकशी करील किंवा त्या प्रयोजनासाठी चौकशी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याची गरज आहे असे त्यास वाटल्यास तो, पोट-नियम (२) अन्वये अशी नियुक्ती करू शकेल आणि ज्या बाबतीत शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपाच्या सर्व बाबींची कबुली दिली असेल त्या बाबतीत शिस्तभंगविषयक प्राधिकरण, त्याला योग्य वाटेल तो पुरावा ग्राह्य मानून प्रत्येक दोषारोपावरील आपले निष्कर्ष नमूद करून ठेवील आणि या नियमांच्या नियम ९ मध्ये निर्धारित केलेल्या पद्धतीने कार्यवाही करील.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नसेल तर, शिस्तभंगविषयक प्राधिकरणास स्वत: दोषारोपाची चौकशी करता येईल किंवा त्या प्रयोजनासाठी चौकशी प्राधिकरणाची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे त्यास वाटल्यास, या नियमांच्या पोट-नियम (२) अन्वये त्याला तशी नियुक्ती करता येईल.

(क) ज्या बाबतीत शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने चौकशी प्राधिकाऱ्याची नियुक्ती केली असेल त्याबाबतीत, शिस्तभंगविषयक प्राधिकारी आदेश काढून, दोषारोपाच्या बाबीच्या पुष्ट्यर्थ चौकशी प्राधिकऱ्यापुढे प्रकरण सादर करण्यासाठी " सादरकर्ता अधिकारी " म्हणून शासकीय कर्मचारी किंवा विधीव्यवसायी यांची नेमणूक करू शकेल.

(६) शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे ज्या बाबतीत चौकशी प्राधिकरण नसेल त्याबाबतीत ते पुढील गोष्टी प्राधिकरणाकडे अग्रेषित करील :—

(एक) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीची प्रत आणि गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र,

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले असल्यास त्याची प्रत,

(तीन) या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या साक्षीदारांनी कोणतीही निवेदने केलेली असल्यास त्याच्या प्रती,

(चार) शासकीय कर्मचाऱ्याला पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कागदपत्रे देण्यात आली असल्याचे सिद्ध करणारा पुरावा, आणि

(पाच) सादरकर्ता अधिकाऱ्याच्या नियुक्ती आदेशाची प्रत.

(७) शासकीय कर्मचारी त्याला दोषारोपाच्या सर्व बाबी व गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र मिळाल्याच्या तारखेपासून, कार्यालयीन कामकाजाच्या दहा दिवसांच्या आत याबाबतीत चौकशी प्राधिकरणाने लेखी नोटिशीद्वारे विनिर्दिष्ट केले असेल त्या दिवशी व त्या वेळी किंवा चौकशी प्राधिकरण मुभा देईल अशा आणखी दहा दिवसांहून अधिक नसेल इतक्या पुढील कालावधीत स्वत: चौकशी प्राधिकरणापुढे हजर होईल.

(८) शासकीय कर्मचारी आपल्या वतीने प्रकरण सादर करण्यास इतर कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची **#अथवा सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याची** मदत घेऊ शकेल. परंतु, शिस्तभंगविषयक

# शासन अधिसूचना, क्र.सीडीआर.१०९६/प्र.क्र.८३/९६/अकरा, दिनांक १० जून १९९८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

प्राधिकरणाने नियुक्त केलेला सादरकर्ता अधिकारी हा विधीव्यवसायी असल्याखेरीज किंवा प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने विधीव्यवसायीची मदत घेण्याची परवानगी दिली असल्याखेरीज या प्रयोजनासाठी विधीव्यवसायीची मदत घेऊ शकणार नाही.

(९) ज्याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपाच्या एकाही बाबीसंबंधी कबुली दिली नसेल, किंवा बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नसेल असा शासकीय कर्मचारी चौकशी प्राधिकरणापुढे हजर होईल तेव्हा चौकशी प्राधिकरण त्या कर्मचाऱ्याला तो दोषी आहे किंवा कसे अथवा त्याला कोणत्याही स्वरूपाचा बचाव करावयाचा आहे काय असे विचारील आणि जर दोषारोपाच्या कोणत्याही बाबीसंबंधात तो आपला गुन्हा कबूल करील तर चौकशी प्राधिकरण त्याचा युक्तीवाद नमूद करून ठेवील, त्या अभिलेखावर सही करील व त्यावर त्या शासकीय कर्मचाऱ्याची सही घेईल.

(१०) शासकीय कर्मचाऱ्याने ज्या आरोपाबाबत आपला गुन्हा कबूल केला असेल त्यासंबंधात चौकशी प्राधिकरण, त्या आरोपाच्या सिद्धतेबाबतचे आपले निष्कर्ष विवरणासह परत पाठवील.

(११) शासकीय कर्मचारी विनिर्दिष्ट कालावधीमध्ये चौकशी प्राधिकरणासमोर उपस्थित राहण्यात कसूर करीत असेल किंवा आपली बाजू मांडण्याचे नाकारीत असेल किंवा बाजू मांडत नसेल तर, चौकशी प्राधिकरण, सादरकर्ता अधिकाऱ्यास त्याने ज्यांच्या आधारे शासकीय कर्मचाऱ्यावरील दोषारोप सिद्ध करावयाचे ठरविले असेल तो पुरावा सादर करण्यास भाग पाडील आणि शासकीय कर्मचारी आपल्या बचावाची तयारी करण्यासाठी पुढील गोष्टी करू शकेल, अशा आदेशाची नोंद केल्यानंतर तीस दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या तारखेपर्यंत प्रकरण स्थगित ठेवील :—

(एक) आदेशाच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत किंवा चौकशी प्राधिकरण मुभा देईल अशा, पाच दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या आणखी कालावधीमध्ये या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमधील कागदपत्रांची तपासणी करणे,

(दोन) त्याच्या वतीने तपासणी करण्यात यावयाच्या साक्षीदाराची यादी सादर करणे,

(तीन) जी कागदपत्रे शासनाच्या ताब्यात आहेत परंतु या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये दर्शविलेल्या यादीमध्ये ज्या कागदपत्रांचा समावेश झालेला नाही, अशा कागदपत्रांचा शोध घेणे, किंवा ती सादर करणे यासाठी आदेशापासून १० दिवसांच्या आत किंवा चौकशी प्राधिकरण मुभा देईल अशा १० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या कालावधीमध्ये कागदपत्रांची संबद्धता नमूद करून नोटीस देणे.

(१२) या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीत नमूद केलेल्या साक्षीदारांच्या निवेदनाच्या प्रती पुरविण्याबाबत शासकीय कर्मचाऱ्याने तोंडी किंवा लेखी विनंती केली असेल अशा

बाबतीत चौकशी प्राधिकरण शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या वतीने साक्षीदारांची तपासणी सुरू होण्यापूर्वी तीन दिवसांपेक्षा उशीराचा नसेल अशा कालावधीमध्ये त्याला अशा प्रती पुरवील.

(१३) ज्या बाबतीत चौकशी प्राधिकरणास कागदपत्रांचा शोध घेणे किंवा ती सादर करणे या संबंधीची नोटीस शासकीय कर्मचाऱ्याकडून मिळेल त्या बाबतीत ते प्राधिकरण, उक्त कागदपत्रे ज्याच्या ताब्यात किंवा कब्जात असतील त्या प्राधिकरणाकडे ती नोटीस किंवा तिच्या प्रती पाठवील व त्यासह एक मागणीपत्र पाठवून, त्या मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस अशी कागदपत्रे सादर करण्याबाबत कळवील :

परंतु, चौकशी प्राधिकरण, त्याच्या मते प्रकरणाशी संबंधित नसतील अशा कागदपत्रांची मागणी करण्यास नकार देऊ शकेल, त्याची कारणे मात्र त्याला लेखी नमूद करावी लागतील.

(१४) पोट-नियम (१३) मध्ये निर्दिष्ट केलेले मागणीपत्र मिळाल्यावर असे, मागणी करण्यात आलेले कागदपत्र ज्याच्या ताब्यात आणि कब्जात असतील असे प्रत्येक प्राधिकरण त्याच्या ताब्यातील किंवा कब्जातील मागणी केलेली कागदपत्रे चौकशी प्राधिकरणापुढे सादर करील :

परंतु, मागणी केलेली कागदपत्रे ज्याच्या ताब्यात किंवा कब्जात असतील त्या प्राधिकरणाची जर, खात्री पटली असेल की, अशी सर्व किंवा कोणतीही कागदपत्रे सादर करणे हे सार्वजनिक हितास किंवा राज्याच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल तर ते तशी कारणे नमूद करील व चौकशी प्राधिकरणास तसे कळवील, आणि असे कळविण्यात आल्यावर चौकशी प्राधिकरण, शासकीय कर्मचाऱ्याला ती माहिती कळवील व अशी कागदपत्रे शोधून सादर करण्याबाबत त्याने केलेली मागणी रद्द करेल.

(१५) चौकशी प्राधिकरणाकडून चौकशी सरू करण्याविषयी निश्चित करण्यात आलेल्या तारखेस चौकशीस प्रारंभ करण्यात येईल आणि त्यानंतर त्या प्राधिकरणाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल किंवा येतील अशा तारखेस किंवा तारखांना ती पुढे चालू ठेवण्यात येईल.

(१६) चौकशीसाठी निश्चित केलेल्या तारखेला ज्या पुराव्याच्या आधारे दोषारोप सिद्ध करावयाचे प्रस्तावित केले असेल तो मौखिक व कागदोपत्री पुरावा शिस्तभंगविषयक प्राधिकरणाकडून किंवा त्यांच्यावतीने सादर करण्यात येईल. साक्षीदारांची तपासणी सादरकर्ता अधिकाऱ्याकडून किंवा त्याच्यावतीने करण्यात येईल आणि साक्षीदारांची उलट तपासणी शासकीय कर्मचाऱ्याकडून किंवा ह्यांच्यावतीने करता येईल. साक्षीदाराची ज्या मुद्द्यावर उलटतपासणी करण्यात आली असेल त्यापैकी कोणत्याही मुद्द्याची फेरतपासणी करण्याचा सादरकर्ता अधिकाऱ्यास हक्क असेल, परंतु चौकशी प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय कोणत्याही नवीन बाबीसंबंधात साक्षीदारांची फेरतपासणी करण्याचा हक्क त्याला असणार नाही. चौकशी प्राधिकरणाससुद्धा त्याला योग्य वाटेल असे प्रश्न साक्षीदारांना विचारता येतील.

(१७) प्रकरण बंद करण्यापूर्वी शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्यावतीने आवश्यकता भासत असेल तर, चौकशी प्राधिकरण, आपल्या स्वेच्छाधिकारे शासकीय कर्मचाऱ्याला दिलेल्या यादीमध्ये समाविष्ट न करण्यात आलेला पुरावा सादर करण्यास सादरकर्ता अधिकाऱ्याला परवानगी देऊ शकेल किंवा स्वतःहून नवीन पुरावा मागवू शकेल किंवा एखाद्या साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची फेरतपासणी करू शकेल आणि अशा बाबतीत शासकीय कर्मचाऱ्याने मागणी केल्यास त्याला नवीन पुराव्याच्या यादीची प्रत मिळण्याचा आणि असा नवीन पुरावा सादर करण्यापूर्वी तीन पूर्ण दिवसांकरिता चौकशी तहकूब करून मिळण्याचा हक्क असेल. यात, चौकशी तहकूब केल्याचा दिवस आणि ज्या दिवसापर्यंत चौकशी तहकूब केली तो दिवस, धरण्यात येणार नाही. चौकशी प्राधिकरण, शासकीय कर्मचाऱ्याला अशी कागदपत्रे, त्यांची अभिलेख्यात नोंद करण्यापूर्वी तपासण्याची संधी देईल. चौकशी प्राधिकाऱ्याच्या मते, असा पुरावा सादर करणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक असेल तर तो शासकीय कर्मचाऱ्याला नवीन पुरावा सादर करण्यासही अनुमती देऊ शकेल :

परंतु, मुळात सादर करण्यात आलेल्या पुराव्यात अंगभूत उणिवा किंवा दोष असल्याखेरीज त्या पुराव्यातील कोणतीही तफावत भरून काढण्यासाठी कोणताही नवीन पुरावा सादर करण्यास परवानगी दिली जाणार नाही किंवा कोणताही नवीन पुरावा मागविला जाणार नाही किंवा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावण्यात येणार नाही.

(१८) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाची बाजू मांडून झाल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्याला, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, आपला बचाव तोंडी किंवा लेखी नमूद करण्यास फर्मविण्यात येईल. त्याने तोंडी बचाव दिला असेल तर त्याची अभिलेखात नोंद करण्यात येईल आणि शासकीय कर्मचाऱ्यास त्यावर सही करण्यास सांगण्यात येईल. दोन्हीपैकी कोणत्याही बाबतीत, बचावाच्या निवेदनाची प्रत, कोणताही सादरकर्ता अधिकारी नियुक्त केला असेल तर, त्याला दिली जाईल.

(१९) त्यानंतर शासकीय कर्मचाऱ्याच्या वतीने पुरावा सादर करण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यास स्वतःच्या- वतीने स्वतःची तपासणी स्वतःच करावी असे वाटत असेल तर, तो तसे करू शकेल. त्यानंतर शासकीय कर्मचाऱ्याने सादर केलेल्या साक्षीदारांची तपासणी केली जाईल आणि उलटतपासणी, फेरतपासणी किंवा तपासणी चौकशी प्राधिकरणाकडून केली जाईल. ही तपासणी साक्षीदारांना लागू असणाऱ्या तरतुदीनुसार केली जाईल.

(२०) चौकशी प्राधिकारी शासकीय कर्मचाऱ्याने त्याचे प्रकरण पूर्ण केल्यानंतर आणि शासकीय कर्मचाऱ्याने स्वतः तपासणी केली नसेल तर सर्वसाधारणपणे पुराव्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द दिसून येणाऱ्या कोणत्याही परिस्थितीचे स्पष्टीकरण करणे त्याला शक्य व्हावे म्हणून त्या परिस्थितीबाबत प्रश्न विचारू शकेल.

**(२१) पुरावा सादर करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर चौकशी** प्राधिकरण, कोणत्याही सादरकर्ता अधिकाऱ्याची नियुक्ती झाली असल्यास त्या अधिकाऱ्याचे व शासकीय कर्मचाऱ्याचे म्हणणे ऐकून घेईल, किंवा त्यांना आपापल्या संबंधित प्रकरणांची लेखी टाचणे सादर करण्याची इच्छा असेल तर त्यांना तसे करण्यास परवानगी देऊ शकेल.

(२२) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला दोषारोपाच्या बाबींची प्रत देण्यात आली आहे, त्याने बचावाचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी असे निवेदन सादर केले नसेल किंवा तो चौकशी प्राधिकरणापुढे जातीने उपस्थित झाला नसेल किंवा अन्यथा या नियमाच्या तरतुदीचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केली असेल किंवा तसे करण्यास नकार दिला असेल तर, चौकशी प्राधिकरण एकतर्फी चौकशी करू शकेल.

(२३) (अ) ज्याबाबतीत कोणतीही किरकोळ शिक्षा करण्यास सक्षम असणाऱ्या परंतु कोणतीही जबर शिक्षा करण्यास सक्षम नसणाऱ्या शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने आरोपाच्या कोणत्याही बाबींची स्वत: चौकशी केलेली असेल किंवा करवून घेतलेली असेल आणि त्याचा स्वत:चा निष्कर्ष किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही चौकशी प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही निष्कर्षावरील स्वत:चा निर्णय विचारात घेतल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा केली पाहिजे असे त्याचे मत झाले असेल त्याबाबतीत ते प्राधिकरण अशी जबर शिक्षा करण्यास सक्षम असणाऱ्या शिस्तभंगविषयक प्राधिकरणाकडे चौकशीचा अभिलेख पाठविल.

(ब) ज्या शिस्तभंगविषयक प्राधिकरणाकडे अशा प्रकारे अभिलेख अग्रेषित करण्यात आला आहे, ते प्राधिकरण अभिलेखाद्वारे मिळालेल्या पुराव्यावर कार्यवाही करू शकेल, किंवा त्याच्या मते न्यायहिताच्या दृष्टीने कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे आवश्यक असेल तर त्या साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी, उलटतपासणी व फेरतपासणी करू शकेल, आणि या नियमानुसार त्याला योग्य वाटेल अशी शिक्षा शासकीय कर्मचाऱ्याला करु शकेल :

परंतु, कोणत्याही साक्षीदारांना पुन्हा बोलावले असेल तर, त्याची शासकीय कर्मचाऱ्याकडून किंवा त्याच्यावतीने उलटतपासणी करता येईल.

(२४) ज्या ज्या वेळी, कोणतेही चौकशी प्राधिकरण एखाद्या चौकशीतील कर्मचाऱ्याचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि संपूर्ण पुराव्याची किंवा पुराव्यातील कोणत्याही भागाची नोंद केल्यानंतर, त्या चौकशीत आपली अधिकारिता वापरल्याचे थांबवत असेल त्या प्राधिकरणाच्या जागी अशी अधिकारिता असलेले दुसरे चौकशी प्राधिकरण नेमण्यात आले असेल व ते अशा अधिकारितेचा वापर करीत असेल

त्या त्या वेळी, असे नंतर येणारे प्राधिकरण पूर्वीच्या प्राधिकरणाने नोंदविलेल्या पुराव्यावरून किंवा अंशतः पूर्वीच्या प्राधिकरणाने व अंशतः स्वतः नोंदविलेल्या पुराव्यावरून कार्यवाही करू शकेल :

परंतु, ज्यांची साक्ष या अगोदरच नोंदविण्यात आली आहे अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे, न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे नंतर आलेल्या चौकशी प्राधिकरणाचे मत असेल तर, त्या प्राधिकरणास यात यापूर्वीच तरतूद केल्याप्रमाणे अशा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी, उलटतपासणी आणि फेरतपासणी करता येईल :

परंतु असे की, कोणत्याही साक्षीदारांस पुन्हा बोलावण्यात आले असेल तर, शासकीय कर्मचाऱ्यास किंवा त्याच्या वतीने त्यांची उलटतपासणी करता येईल.

(२५) चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी प्राधिकरणाकडून अहवाल तयार करण्यात येईल. या अहवालामध्ये पुढे दिलेल्या बाबी नमूद करण्यात येतील :—

(अ) दोषारोपाच्या बाबी आणि गैरवर्तनाच्या किंवा गैरवर्तणुकीच्या आरोपांचे विवरणपत्र,

(ब) दोषारोपाच्या प्रत्येक बाबींच्या संबंधात शासकीय कर्मचाऱ्याने केलेला बचाव,

(क) दोषारोपाच्या प्रत्येक बाबी संबंधातील पुराव्याचे मूल्यमापन,

(ड) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीवरील निष्कर्ष आणि त्याची कारणे.

*[(ई) शिक्षेच्या प्रमाणसंबंधात शिफारस.]

(२६) ज्या बाबतीत चौकशी प्राधिकरणाच्या मते, चौकशीच्या कामकाजामधून मूळ दोषारोपापेक्षा वेगळा दोषारोप सिद्ध होत असेल अशा बाबतीत अशा दोषारोपाच्या संबंधातील आपले निष्कर्ष त्याला नमूद करता येतील.

परंतु, असा दोषारोप ज्या तथ्यांवर आधारलेला असेल ती तथ्ये शासकीय कर्मचाऱ्याने कबूल केली असल्याखेरीज किंवा अशा दोषारोपांविरुद्ध स्वतःचा बचाव करण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आल्याखेरीज अशा दोषारोपांचे निष्कर्ष नमूद करण्यात येणार नाहीत.

(२७) चौकशी प्राधिकरण, हे स्वतः शिस्तभंगविषयक प्राधिकरण नसेल त्याबाबतीत ते, शिस्तभंगविषयक प्राधिकरणाकडे चौकशीचे अभिलेख अग्रेषित करील. या अभिलेखांमध्ये पुढे दिलेल्या बाबी समाविष्ट असतील :—

* अधिसूचना क्र.सीडीआर-१०९६/प्र.क्र.५८/९६/अकरा, दिनांक १ डिसेंबर १९९७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

(अ) पोट-नियम (२५) अन्वये त्याने तयार केलेला अहवाल.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले असल्यास ते लेखी निवेदन.

(क) चौकशी चालू असताना सादर करण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा.

(ड) चौकशीचे काम चालू असताना सादरकर्ता अधिकाऱ्याने किंवा शासकीय कर्मचाऱ्याने किंवा दोघांनी सादर केलेली कोणतीही लेखी टाचणे असल्यास ती टाचणे, आणि

(ई) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने आणि चौकशी प्राधिकरणाने चौकशीच्या संबंधात कोणतेही आदेश दिले असल्यास ते आदेश.

९. **चौकशी अहवालावरील कार्यवाही**— (१) शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे स्वत: चौकशी प्राधिकरण नसेल तर ते लेखी कारणे नमूद करून सदर प्रकरण अधिक चौकशीसाठी आणि अहवालासाठी चौकशी प्राधिकरणाकडे पाठवू शकेल, आणि त्यानंतर चौकशी प्राधिकरण, शक्यतोवर या नियमाच्या नियम ८ च्या तरतुदी अन्वये या संबंधात अधिक चौकशी करण्याकरिता कार्यवाही करील.

(२) शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे स्वत: चौकशी प्राधिकरण नसेल त्याबाबतीत ते चौकशी अभिलेख विचारात घेईल आणि प्रत्येक दोषारोपांच्या संबंधातील आपले निष्कर्ष नमूद करील, दोषारोपांच्या कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी प्राधिकरणाच्या निष्कर्षाशी ते सहमत नसेल तर ते अशा मतभेदाची कारणे नमूद करील.

(३) दोषारोपांच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधातील आपले निष्कर्ष लक्षात घेता, शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल त्या बाबतीत या नियमांच्या नियम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, नियम ८ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीच्या वेळी पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे, शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही शिक्षा द्यावयाची असल्यास, कोणती शिक्षा द्यावी ते निश्चित करील आणि ती शिक्षा देण्यासंबंधी आदेश काढील.

परंतु, असे की, जेथे आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणी, शिस्तभंगविषयक प्राधिकरण चौकशीचा अभिलेख, सल्ला घेण्याकरिता आयोगाकडे पाठविल आणि शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही शिक्षा देण्यासंबंधातील आदेश काढण्यापूर्वी हा सल्ला विचारात घेण्यात येईल.

*(४) दोषारोपाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधातील आपले निष्कर्ष विचारात घेतल्यावर, आणि चौकशीच्या वेळी पुढे आलेल्या पुराव्याच्या आधारे, नियम ५, पोट-नियम (१) च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा शासकीय कर्मचाऱ्यास द्यावी असे

* अधिसूचना क्र.सीडीआर-११८४/१३८०/२७/अकरा, दिनांक १५ नोव्हेंबर, १९८५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल त्याबाबतीत, ते असा शिक्षा देणारा आदेश काढील आणि शासकीय कर्मचाऱ्यास, त्याला देण्यात यावयाच्या शिक्षेबद्दल कोणतेही अभिवेदन करण्याची संधी देणे आवश्यक असणार नाही.

परंतु, आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणी, शिस्तभंगविषयक प्राधिकरण चौकशीचा अभिलेख सल्ला घेण्याकरिता आयोगाकडे पाठवील, आणि शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही शिक्षा देण्यासंबंधातील आदेश काढण्यापूर्वी, हा सल्ला विचारात घेण्यात येईल.

**१०. किरकोळ शिक्षा देण्याबाबतची कार्यपद्धती**—(१) नियम ९ च्या पोटनियम (३) मध्ये केलेल्या तरतुदीखेरीज, शासकीय कर्मचाऱ्याला दिल्या जाणाऱ्या किरकोळ शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यासंबंधात पुढे नमूद केलेल्या बाबी पूर्ण केल्याशिवाय कोणताही आदेश देण्यात येणार नाही :—

(अ) शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध करावयाची प्रस्तावित कार्यवाही व गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या ज्या आरोपांमुळे ही कार्यवाही करण्याचे योजिले आहे ते आरोप लेखी कळविणे आणि प्रस्तावाविरुध्द अभिवेदन करण्याची त्याची इच्छा असेल ते अभिवेदन करण्याची त्याला वाजवी संधी देणे,

(ब) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या मते ज्या प्रकरणी चौकशी आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणात नियम ८ मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार चौकशी करणे,

(क) या नियमाच्या खंड (अ) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याने कोणतेही अभिवेदन केले असल्यास, ते अभिवेदन आणि या नियमाच्या खंड (ब) अन्वये कोणतीही चौकशी केली असल्यास त्या चौकशीचा अभिलेख विचारात घेणे,

(ड) गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या प्रत्येक आरोपाचा निष्कर्ष नमूद करणे, आणि

(ई) आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असेल अशा बाबतीत असा विचारविनिमय करणे.

(२) पोट-नियम (१) च्या खंड (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही एखाद्या प्रकरणात त्या पोट-नियमाच्या खंड (अ) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याने अभिवेदन केले असल्यास ते अभिवेदन विचारात घेतल्यानंतर (त्याच्या) वेतनवाढी रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल आणि अशा वेतनवाढी रोखून ठेवण्यामुळे कर्मचाऱ्याला देय असलेल्या निवृत्तीवेतनाच्या रकमेवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल किंवा ३ वर्षांपेक्षा अधिक असेल एवढ्या कालावधीकरिता वेतनवाढ रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल **#किंवा नियम ५ च्या पोट नियम (१) चे खंड (पाच) व (सहा) यामध्ये विनिर्दिष्ट शिक्षांपैकी कोणतीही**

---

# शासन अधिसूचना क्र.सीडीआर-१००५/प्र.क्र.२४/०५/अकरा, दिनांक २९ डिसेंबर, २००६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

शिक्षा द्यावयाची असेल तर, किंवा भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करून कोणत्याही कालावधीकरिता वेतनवाढी रोखण्याचे प्रस्तावित केले असेल तर, शासकीय कर्मचाऱ्याला अशी कोणतीही शिक्षा देण्याचा आदेश देण्यापूर्वी नियम ८ च्या पोट-नियम (३) ते (२७) मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार चौकशी करण्यात येईल.

(३) अशा प्रकरणांच्या कार्यवाहीच्या अभिलेखात पुढील बाबींचा समावेश असेल :—

(एक) शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्यावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीसंबंधीच्या प्रस्तावाच्या सूचनेची प्रत,

(दोन) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन याबाबतच्या आरोपाच्या विवरणपत्राची कर्मचाऱ्याला देण्यात आलेली प्रत,

(तीन) कर्मचाऱ्याने कोणतीही अभिवेदने दिली असल्यास ती अभिवेदने,

(चार) चौकशीमध्ये सादर करण्यात आलेला पुरावा,

(पाच) आयोगाचा सल्ला घेतला असल्यास त्याची प्रत,

(सहा) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन या संबंधातील प्रत्येक आरोपावरील निष्कर्ष, आणि

(सात) प्रकरणावरील आदेश व त्याची कारणे.

**११. कर्मचाऱ्यास आदेश कळविणे.**— शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने दिलेले आदेश शासकीय कर्मचाऱ्याला कळविण्यात येतील. त्याचबरोबर शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने कोणतीही चौकशी केली असल्यास त्या चौकशीच्या अहवालाची एक प्रत आणि दोषारोपाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील निष्कर्षाची एक प्रत किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे स्वत: चौकशी प्राधिकरण नसेल त्या बाबतीत, चौकशी प्राधिकरणाने दिलेल्या अहवालाची एक प्रत, आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरण जेथे चौकशी प्राधिकरणाच्या निष्कर्षाशी सहमत नसेल तेथे त्याची थोडक्यात कारणे आणि चौकशी प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षासह शिस्तभंगविषयक प्राधिकरणाच्या निष्कर्षाचे विवरणपत्र (त्यापूर्वीच कर्मचाऱ्याला कळविण्यात आले नसतील तर) तसेच; आयोगाचा सल्ला घेतला असल्यास त्याची एक प्रत आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने जेथे आयोगाचा सल्ला स्वीकारलेला नसेल तेथे त्याबाबतच्या कारणांचे थोडक्यात विवरण या प्रतीही त्याला देण्यात येतील.

**१२. एकत्रित कार्यवाही.**—(१) ज्या प्रकरणात दोन किंवा अधिक शासकीय कर्मचारी संबंधित असतील अशा कोणत्याही बाबतीत राज्यपाल किंवा अशा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यास सक्षम असलेले दुसरे कोणतेही प्राधिकरण एकत्रित कार्यवाही करून त्या सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निदेश देणारा आदेश देऊ शकेल.

(२) अशा शासकीय कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याची शिक्षा देण्यास सक्षम असलेली प्राधिकरणे वेगवेगळी असतील अशा बाबतीत, अशा प्राधिकरणापैकी सर्वोच्च असणारे प्राधिकरण इतर प्राधिकरणांच्या संमतीने एकत्रित कार्यवाही करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) एकत्रित कार्यवाही करून शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबत देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशामध्ये पुढे नमूद केलेल्या बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील :—

(एक) अशी एकत्रित कार्यवाही करण्याकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकरण म्हणून काम पाहू शकेल असे प्राधिकरण,

(दोन) असे शिस्तभंगविषयक प्राधिकरण ज्या शिक्षा देण्यास सक्षम असेल अशा, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा,

(तीन) कार्यवाही करताना नियम ८ आणि नियम ९ किंवा नियम १० मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबण्यात येईल किंवा कसे.

१३. **विवक्षित प्रकरणांमध्ये विशेष कार्यपद्धती.**—या नियमांच्या नियम ८ ते नियम १२ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी—

(एक) शासकीय कर्मचाऱ्याच्या ज्या वर्तनामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात येऊन तो दोषी ठरला असेल व त्याला कोणतीही शिक्षा देय झाली असेल, किंवा

(दोन) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पद्धतीनुसार चौकशी करणे वाजवी रीतीने व्यवहार्य ठरत नाही अशी शिस्तभंगविषयक प्राधिकरणाची खात्री पटली असेल व त्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केली असतील, किंवा

(तीन) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पध्दतीनुसार कोणतीही चौकशी करणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट नाही, अशी राज्यपालांची खात्री पटली असेल अशा बाबतीत शिस्तभंगविषयक प्राधिकरण प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन त्यासंबंधी त्यास योग्य वाटतील ते आदेश देऊ शकेल,

@(चार) अपचारी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर शिस्तभंग कारवाई तात्काळ संपुष्टात येते. त्यामुळे या नियमाखालील कोणतीही शिस्तभंग कारवाई संबंधित अपचारी शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर चालू ठेवता येणार नाही.

*[परंतु खंड (एक) खालील कोणत्याही प्रकरणी कोणताही आदेश काढण्यात येण्यापूर्वी, शासकीय कर्मचाऱ्यास त्याला देण्यात यावयाच्या शिक्षेबाबत अभिवेदन करण्याची संधी दिली जाऊ शकेल :

परंतु असे की, या नियमान्वये कोणत्याही प्रकरणी कोणतेही आदेश काढण्यापूर्वी आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असेल तर तसा विचारविनिमय करण्यात येईल.]

---

@ शासन अधिसूचना क्र.सीडीआर-११९९/प्र.क्र.१३/९९/अकरा, दिनांक २३ फेब्रुवारी, २००० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* हा मजकूर अधिसूचना क्रमांक सीडीआर ११८८/१५८२/सीआर ३८/८८/११, दि.१२ ऑक्टोबर १९९० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१४. भारतामधील कोणतेही शासन, स्थानिक प्राधिकरण, इत्यादींना ज्यांच्या सेवा उसन्या दिलेल्या असतील अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीतील तरतुदी.**—(१) शासकीय कर्मचाऱ्यांची सेवा शासनामधील एका विभागाने दुसऱ्या विभागाला किंवा भारतामधील दुसऱ्या कोणत्याही शासनाला किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या प्राधिकरणाला किंवा स्थानिक किंवा (शासनाच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणतीही कंपनी किंवा कोणतेही महामंडळ यांसह) इतर प्राधिकरणाला (या नियमांमध्ये यापुढे ज्याचा "उसनी सेवा घेणारे प्राधिकरण" म्हणून निर्देश केलेला आहे) उसनी दिलेली असेल त्या बाबतीत, अशी उसनी सेवा घेणाऱ्या प्राधिकरणाला अशा शासकीय कर्मचाऱ्याला निलंबनाधीन ठेवण्याच्या प्रयोजनाकरिता नियुक्ती प्राधिकरणाचे तसेच त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या प्रयोजनाकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे अधिकार असतील :

परंतु असे की, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण, शासकीय कर्मचाऱ्याची सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला (या नियमामध्ये यापुढे ज्याचा "सेवा उसनी देणारे प्राधिकरण" असा निर्देश केलेला आहे) अशा शासकीय कर्मचाऱ्याला निलंबित करण्याचा आदेश देण्यास किंवा यथास्थिती, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही सरू करण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती तात्काळ कळवील.)

(२) शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करताना काढण्यात आलेले निष्कर्ष विचारात घेता—

(एक) शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी असे उसनी सेवा घेणाऱ्या प्राधिकरणाचे मत असेल तर ते, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर त्यासंबंधात त्यास आवश्यक वाटतील ते आदेश देऊ शकेल :

परंतु, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण व सेवा उसनी देणारे प्राधिकरण यांच्यात काही मतभेद असतील तर, शासकीय कर्मचाऱ्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करण्यात येईल,

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा देण्यात यावी असे शासकीय कर्मचाऱ्याची सेवा उसनी घेणाऱ्या प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, त्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करील आणि चौकशीविषयक कामकाजही त्या प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील आणि त्यानंतर सेवा उसनी देणारे प्राधिकरण हे जर शिस्तभंगविषयक प्राधिकरण असेल तर ते, त्यावर त्याला आवश्यक वाटतील असे आदेश काढील किंवा जर ते शिस्तभंगविषयक प्राधिकरण नसेल तर ते प्रकरण शिस्तभंगविषयक प्राधिकरणास सादर करील आणि शिस्तभंगविषयक प्राधिकरण त्यावर त्यास आवश्यक वाटतील असे आदेश काढील :

परंतु, असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी शिस्तभंगविषयक प्राधिकरण, या नियमांच्या नियम ९ च्या पोट-नियम (३) व (४) च्या तरतुदींचे अनुपालन करील.

(३) शिस्तभंगविषयक प्राधिकरण एकतर, सेवा उसनी घेणाऱ्या प्राधिकरणाने त्याच्याकडे पाठविलेल्या चौकशी अभिलेखाच्या आधारे किंवा शक्यतोवर या नियमांच्या नियम ८ च्या तरतुदींनुसार त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे पुढील चौकशी केल्यानंतर या नियमाच्या पोट-नियम (२) च्या खंड (दोन) खाली आदेश काढू शकेल.

**१५. भारतातील कोणतेही शासन, स्थानिक प्राधिकरण, इत्यादींकडून उसन्या घेतलेल्या अधिकाऱ्यांसंबंधी तरतूद.**—(१) ज्या शासकीय कर्मचाऱ्याची सेवा एका शासकीय विभागाने दुसऱ्या शासकीय विभागाकडून किंवा भारतातील कोणत्याही शासनाकडून किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाकडून (यामध्ये शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कंपनीचा किंवा महामंडळाचा समावेश केला आहे) उसनी घेतली असेल अशा कर्मचाऱ्याविरुद्ध निलंबनाचा आदेश देण्यांत आला असेल किंवा शिस्तभंगविषयक कार्यवाही केलेली असेल त्याबाबतीत, ज्या परिस्थितीमुळे त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आदेश काढावा लागला असेल किंवा, यथास्थिती, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करावी लागली असेल त्या परिस्थितीची माहिती त्याची सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला (या नियमात यापुढे ज्याला "सेवा उसनी देणारे प्राधिकरण" असे निर्देशिलेले आहे) तात्काळ कळविण्यात येईल.

(२) शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध केलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील निष्कर्षांना अनुलक्षून,—

(एक) जर त्या कर्मचाऱ्याला कोणतीही किरकोळ शिक्षा देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, या नियमांच्या नियम ९ च्या पोट-नियम (३) मधील तरतुदीच्या अधीन राहून, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर, त्याला आवश्यक वाटतील त्याप्रमाणे, त्या प्रकरणात आदेश काढू शकेल :—

परंतु, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण आणि सेवा उसनी देणारे प्राधिकरण या दोघांमध्ये मतभेद असेल तर, शासकीय कर्मचाऱ्यांची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करण्यात येईल,

(दोन) शासकीय कर्मचाऱ्याला कोणतीही जबर शिक्षा देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण, अशा कर्मचाऱ्याची सेवा, सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाकडे परत करील आणि त्याला (सेवा उसनी देणाऱ्या प्राधिकरणाला) आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता चौकशीचे कामकाज त्याच्याकडे हस्तांतरीत करील.

## भाग पाच—अपीले

१६. **ज्याविरुद्ध कोणतेही अपील करता येत नाही असे आदेश.**—या भागामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही पुढील बाबतीत कोणतेही अपील करता येणार नाही :—

(एक) राज्यपालांनी काढलेला कोणताही आदेश,

(दोन) निलंबनाच्या आदेशाव्यतिरिक्त शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील वादकालीन स्वरुपाचा किंवा सहायक स्वरूपाचा किंवा प्रकरण अंतिमरित्या निकालात काढण्याबाबतचा कोणताही आदेश,

(तीन) या नियमांच्या नियम ८ खालील चौकशीच्या ओघात चौकशी प्राधिकरणाने काढलेला कोणताही आदेश.

१७. **ज्याविरुद्ध अपील करता येते असे आदेश.**—नियम १६ च्या तरतुदींच्या अधीन राहून शासकीय कर्मचारी, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही आदेशांविरुद्ध अपील दाखल करू शकेल जसे :—

(एक) या नियमांच्या नियम ४ अन्वये काढलेला किंवा काढला असल्याचे मानण्यात आलेला निलंबन आदेश,

(दोन) या नियमांच्या नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करणारा आदेश—मग तो शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने काढलेला असो किंवा कोणत्याही अपीलीय अथवा पुनरीक्षण प्राधिकरणाने काढलेला असो,

(तीन) या नियमांच्या नियम ५ अन्वये केलेली कोणतीही शिक्षा वाढविणारा आदेश,

(चार) ज्या आदेशामुळे,—

(अ) नियमांद्वारे किंवा कराराद्वारे विनियमित केलेले त्याचे वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन किंवा इतर सेवाशर्ती, त्याला अहितकारक ठरतील अशा प्रकारे नाकारण्यात येतात किंवा त्यामध्ये बदल केला जातो, किंवा

(ब) सेवाप्रवेश नियमांनुसार ज्या पदोन्नतीस तो अन्यथा पात्र ठरला असता अशी आणि त्याच्या वरिष्ठता क्रमानुसार त्याला देय असेल अशी पदोन्नती त्याला नाकारली जाते, किंवा

(क) अशा कोणत्याही नियमाच्या किंवा कराराच्या तरतुदींचा त्याला अहितकारक ठरेल अशा प्रकारे अर्थ लावण्यात येतो, असा आदेश,

(पाच) ज्या आदेशामुळे—

(अ) शासकीय कर्मचारी दक्षतारोध पार करण्यास अयोग्य असल्याच्या कारणावरून समयश्रेणी वेतनावरील दक्षतारोधावर त्याचे वेतन थांबविण्यात येते,

(ब) शिक्षा म्हणून नव्हे तर अन्यथा, तो उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असताना, निम्नश्रेणीतील सेवेत, श्रेणीत किंवा पदावर त्यास पदावनत करण्यात येते,

(क) निवृत्तिवेतनाचे नियमन करणाऱ्या नियमांनुसार त्याला अनुज्ञेय असणारे निवृत्तिवेतन कमी करण्यात येते किंवा रोखून ठेवण्यात येते किंवा कमाल निवृत्तिवेतन नाकारण्यात येते,

(ड) त्याच्या निलंबनाच्या कालावधीकरिता किंवा तो निलंबनाधीन असल्याचे मानले जाते त्या कालावधीकरिता किंवा त्यातील कोणत्याही भागाकरिता, त्याला द्यावयाचा निर्वाहभत्ता व इतर भत्ते निश्चित करण्यात येतात,

(ई) (एक) निलंबन कालावधीकरिता, किंवा

(दोन) त्याला बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून किंवा त्याला निम्नश्रेणीच्या सेवेत, श्रेणीवर, पदावर किंवा समयवेतन श्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून, त्याला त्याच्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पुनःस्थापित करण्याच्या किंवा पूर्ववत घेण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीकरिता, त्याचे वेतन व भत्ते निश्चित करण्यात येतात, किंवा

(फ) त्याला निलंबित केल्याच्या तारखेपासून किंवा त्याला बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून किंवा निम्नश्रेणीतील सेवेत, श्रेणीवर, पदावर, समयवेतनश्रेणीत किंवा समयवेतनश्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून त्याला त्याच्या सेवेत, श्रेणीत किंवा पदावर पुनःस्थपित केल्याचा किंवा पूर्ववत घेतल्याचा कालावधी हा कोणत्याही प्रयोजनासाठी, त्याने कर्तव्यार्थ व्यतीत केलेला कालावधी मानला जाईल किंवा कसे, हे ठरविण्यात येते, असा आदेश.

**स्पष्टीकरण**----या नियमांमध्ये,—

(एक) "शासकीय कर्मचारी" या संज्ञेमध्ये शासकीय सेवेत असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीचाही समावेश होतो.

(दोन) "निवृत्तीवेतन" या संज्ञेमध्ये अतिरिक्त निवृत्तीवेतन, उपदान व अन्य कोणतेही सेवानिवृत्ती लाभ यांचा समावेश होतो.

**१८. अपिलीय प्राधिकरण**—(१) त्या त्या वेळी अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून,

[(एक) गट 'अ' किंवा गट 'ब'च्या सेवेतील व्यक्ती (ज्यामध्ये जी व्यक्ती, ती सेवेत असण्याचे बंद होण्याच्या निकटपूर्वी यापैकी कोणत्याही एका वर्गातील होती, अशा व्यक्तीचा समावेश होतो.) तिला शिक्षा करणाऱ्या व शासनाला दुय्यम असणाऱ्या प्राधिकरणाने काढलेल्या आदेशाविरुद्ध शासनाकडे अपील करू शकेल.] **ऐवजी**

@ (एक) गट 'अ' किंवा गट 'ब'च्या सेवेतील व्यक्ती (गट अ किंवा गट ब च्या सेवेतील व्यक्ती) (ज्यामध्ये जी व्यक्ती, ती सेवेत असण्याचे बंद होण्याच्या निकटपूर्वी यापैकी कोणत्याही एका वर्गातील होती अशा व्यक्तीचा समावेश होतो.)—

(अ) तिला शिक्षा करणाऱ्या व शासनाला दुय्यम असणाऱ्या प्राधिकरणाने काढलेल्या आदेशाविरुद्ध शासनाकडे ;

(ब) ज्या प्रकरणी शिक्षा देण्याचे आदेश शासनाने अथवा शासनास दुय्यम नसणाऱ्या अन्य प्राधिकरणाने काढलेले असल्यास अशा आदेशाविरुद्ध राज्यपालांकडे, अपील करू शकेल.

(दोन) (जी व्यक्ती, ती सेवेत असण्याचे बंद होण्याच्या निकटपूर्वी यापैकी कोणत्याही एका वर्गातील होती, अशा व्यक्तीसह) गट 'क' आणि गट 'ड' च्या सेवेतील व्यक्ती या नियमांच्या नियम ५ अन्वये तिला शिक्षा करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निकटच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अपील करू शकेल. *[आणि त्यानंतर तिला कोणतेही अपील करता येणार नाही.]

(२) या नियमाच्या पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही—

(एक) या नियमांतील नियम १२ अन्वये केलेल्या एकत्रित कार्यवाहीतील आदेशाविरुद्ध करावयाचे अपील हे, त्या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ शिस्तभंगविषयक प्राधिकारी म्हणून कार्य करणारा अधिकारी ज्या प्राधिकाऱ्याला निकट दुय्यम असेल त्या प्राधिकाऱ्याकडे केले पाहिजे.

†[परंतु, पोट-नियम (१) च्या खंड (एक) नुसार, राज्यपाल हे ज्याचे अपीलीय प्राधिकरण आहेत अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत जेव्हा असे प्राधिकरण राज्यपालांना दुय्यम असेल त्यावेळी असे अपील राज्यपालांकडे करण्यात येईल.]

(दोन) ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश ज्या व्यक्तीने काढला असेल ती व्यक्ती नंतरच्या तिच्या नियुक्तीमुळे किंवा अन्य कारणांमुळे अशा आदेशांच्या संबंधात अपीलीय प्राधिकरण होत असेल त्याबाबतीत अशा आदेशाविरुद्धचे अपील अशी व्यक्ती ज्याला लगत दुय्यम असेल अशा प्राधिकरणाकडे करण्यात येईल.

---

@ शासन अधिसूचना क्र. सीडीआर.-११९९/प्र.क्र.१६/९९/अकरा, दिनांक १८ एप्रिल, २००१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* अधिसूचना क्रमांक सीडीआर. ११८८/१५८२/सीआर-३८/८८/११, दि. १२ ऑक्टोबर १९९० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला व नंतरचे परंतुक वगळण्यात आले.

† अधिसूचना क्रमांक सीडीआर. ११८८/१५८२/सीआर-३८/८८/११, दि. १२ ऑक्टोबर १९९० द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१९. **अपीलांकरिता कालमर्यादा**—ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्याला मिळाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या कालावधीत असे अपील केले नाही तर, या भागाअन्वये करण्यात आलेले कोणतेही अपील विचारात घेतले जाणार नाही :

परंतु, अपीलकर्त्याला ठराविक मुदतीत अपील सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत अपीलीय प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर उक्त कालावधी संपल्यानंतरही ते प्राधिकरण अपील स्वीकारु शकेल.

२०. **अपीलांची पद्धती, स्वरूप आणि आशय**—(१) अपील करणारी प्रत्येक व्यक्ती आपले अपील स्वतंत्रपणे आणि आपल्या स्वत:च्या नावाने करील आणि ज्या प्राधिकरणाकडे ते सादर करावयाचे असेल त्या प्राधिकरणाला उद्देशून ते करील.

(२) हे अपील स्वयंपूर्ण असेल आणि त्यामध्ये, ज्यांवर अपीलकर्त्याचा विशेष भर असेल अशा सर्व महत्त्वाच्या विधानांचा आणि युक्तीवादाचा समावेश असेल, परंतु त्यात वापरलेली भाषा अवमानकारक किंवा अशिष्ट नसेल.

२१. **अपील सादर करणे**—(१) प्रत्येक अपील ज्या आदेशाविरुद्ध ते केले असेल तो आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला सादर करण्यात येईल, परंतु

(अ) असे प्राधिकरण हे, अपीलकर्ता ज्या कार्यालयात नोकरीला असेल त्या कार्यालयाचा प्रमुख नसेल, किंवा

(ब) अपीलकर्ता सेवेत असण्याचे बंद झाले असेल आणि सेवेत असण्याचे बंद होण्याच्या लगतपूर्वी तो ज्या कार्यालयात काम करीत होता त्यावेळी असे प्राधिकरण हे, त्याच्या कार्यालयाचा प्रमुख नसेल, किंवा

(क) असे प्राधिकरण हे, खंड (अ) किंवा (ब) निर्देशिलेल्या कोणत्याही कार्यालय प्रमुखाला दुय्यम नसेल त्याबाबतीत अपीलकर्ता सेवेत असेल किंवा नसेल त्याप्रमाणे या पोट-नियमाच्या खंड (अ) किंवा (ब) मध्ये निर्देशिलेल्या कार्यालय प्रमुखाला अपील सादर करण्यात येईल आणि त्यानंतर, असा कार्यालय प्रमुख, ते अपील ज्याच्या आदेशाविरुद्ध करण्यात आले असेल त्या प्राधिकरणाकडे अग्रेषित करील.

(२) अपीलाची एक प्रत थेट अपील प्राधिकरणालाही सादर करण्यात येईल.

२२. **अपीले पुढे पाठविणे**—ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे प्राधिकरण, अपीलाची प्रत मिळाल्यानंतर विनाविलंब अपीलीय प्राधिकरणाकडून कोणताही निदेश मिळण्याची वाट न पाहता प्रत्येक अपील, त्यावरील आपल्या भाष्यासह आणि संबंद्ध अभिलेखासह अपीलीय प्राधिकरणाकडे पाठवील.

**२३. अपीलावर विचारविनिमय**—(१) निलंबनाच्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपीलाच्या बाबतीत अपीलीय प्राधिकरण, या नियमांतील नियम ४ च्या तरतुदींना अनुलक्षून आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील आणि त्यानुसार तो, आदेश कायम ठेवील किंवा रद्द करील.

(२) ज्या नियमांतील नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या किंवा त्या नियमान्वये दिलेली कोणतीही शिक्षा वाढवणाऱ्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल त्याबाबतीत, अपीलीय प्राधिकरण—

(अ) या नियमांमध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन केले आहे किंवा कसे, आणि तसे केले नसल्यास, असे अनुपालन न केल्यामुळे भारताच्या संविधानाच्या कोणत्याही तरतुदींचा भंग झाला आहे, किंवा कसे किंवा न्यायात कसूर झाली आहे किंवा कसे,

(ब) शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षाचे अभिलेखातील पुराव्यामुळे समर्थन होते किंवा कसे, आणि

(क) दिलेली शिक्षा किंवा वाढीव शिक्षा ही पुरेशी आहे किंवा कसे, अपुरी आहे किंवा कसे, अथवा कडक आहे किंवा कसे, याबाबत विचार करील, आणि

(एक) शिक्षा कायम करणारा, वाढवणारा, कमी करणारा किंवा रद्द करणारा आदेश, किंवा

(दोन) ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाकडे प्रस्तुत प्रकरणे, त्या प्रकरणाची परिस्थिती पाहता, त्यास योग्य वाटतील अशा निदेशासह पाठवणारा आदेश काढील, परंतु,

(एक) अपीलीय प्राधिकरण, ते स्वतः किंवा ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश देणारे प्राधिकरण, त्या प्रकरणी जी वाढीव शिक्षा करण्यास सक्षम नसते अशी कोणतीही वाढीव शिक्षा ते देणार नाही,

(दोन) आयोगाचा सल्ला घेणे आवश्यक असेल अशा सर्व प्रकरणांमध्ये आयोगाचा सल्ला घेण्यात येईल.

*(तीन) अपिलीय प्राधिकरणाने जी वाढीव शिक्षा देण्याचे योजिले असेल ती जबर शिक्षांपैकी असेल आणि प्रस्तुत प्रकरणी, नियम ८ अन्वये करावयाची चौकशी आधीच करण्यात आलेली नसेल तर, अपिलीय प्राधिकरण नियम, १३ च्या तरतुदींस अधीन राहून, स्वतःच अशी चौकशी करील किंवा

---

*शासन अधिसूचना क्रमांक सीडीआर. ११८८/१५८२/सीआर-३८/८८/११, दिनांक १२ ऑक्टोबर १९९० अन्वये वगळण्यात आले.

नियम ८ च्या तरतुदींनुसार अशी चौकशी करण्यात यावी असे निदेश देईल, आणि त्यानंतर, अशा चौकशीची कार्यवाही विचारात घेऊन त्यास योग्य वाटतील असे आदेश काढील.

(चार) अपिलीय प्राधिकरणाने जी वाढीव शिक्षा देण्याचे योजिले असेल ती जबर शिक्षांपैकी एक असेल आणि या नियमांतील नियम ८ अन्वये करावयाची चौकशी प्रस्तुत प्रकरणी पूर्वीच करण्यात आलेली असेल तर अपिलीय प्राधिकारी *(शासकीय कर्मचाऱ्याला करावयाची वाढीव शिक्षा नमूद करून नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा त्यानंतर परवानगी देण्यात येईल अशा आणखी पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीत प्रस्तावित वाढीव शिक्षेबद्दल त्याची इच्छा असेल त्याप्रमाणें अभिवेदन सादर करण्यास फर्माविणारी नोटीस शासकीय कर्मचाऱ्यावर बजावली पाहिजे) त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल.

**(पाच) शासकीय कर्मचाऱ्याला जी वाढीव शिक्षा करण्याचे योजिले असेल ती शिक्षा नमूद करून अशी नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा त्यानंतर परवानगी देण्यात येईल अशा आणखी पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल इतका कालावधी अशा प्रस्तावित वाढीव शिक्षेसंबंधी त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे अभिवेदन सादर करण्यास फर्माविणारी नोटीस बजावलेली असल्याखेरीज इतर कोणत्याही प्रकरणामध्ये वाढीव शिक्षा ठोठावणारा आदेश काढता येणार नाही.

(३) या नियमांतील नियम १७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आदेशांविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये अपिलीय प्राधिकारी प्रकरणाच्या संपूर्ण परिस्थितीचा विचार करील आणि त्याला न्याय व निःपक्षपाती वाटतील असे आदेश काढील.

२४. **अपिलातील आदेशांची अंमलबजावणी**—ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारे प्राधिकरण, अपीलीय प्राधिकरणाने संमत केलेले आदेश अंमलात आणील.

## ** भाग सहा—पुनरीक्षण व पुनर्विलोकन

२५. ****पुनरीक्षण**—(१) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्यपाल किंवा या नियमांतील नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या आदेशाविरुद्ध केलेले अपील ज्या प्राधिकरणाकडे करता येते असे कोणतेही प्राधिकरण, कोणत्याही वेळी स्वतःहून किंवा अन्यथा, कोणत्याही चौकशीचा अभिलेख मागवू शकेल आणि या नियमांनुसार किंवा या नियमांतील नियम २९ अन्वये निरसित केलेल्या नियमानुसार देण्यात आलेल्या ज्या आदेशाविरुद्ध अपील करता येते, परंतु असे

---

*वरील अधिसूचनेद्वारे खंड (चार) मधील "शासकीय कर्मचाऱ्याला" या शब्दांनी सरू होणारा आणि "बजावली पाहिजे" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

**शासन अधिसूचना क्रमांक सीडीआर. ११८८/१५८२/सीआर-३८/८८/११, दिनांक १२ ऑक्टोबर १९९० अन्वये वगळण्यात आले.

कोणतेही अपील करण्यात आलेले नसेल अशा कोणत्याही आदेशाचे अथवा ज्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येत नाही अशा प्रकरणी, जेथे आवश्यक असेल तेथे आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर अशा आदेशांचे @पुनरीक्षण करु शकेल आणि,—

(अ) तो आदेश कायम करू शकेल, त्यात सुधारणा करू शकेल किंवा तो रद्द करू शकेल किंवा

(ब) त्या आदेशाद्वारे देण्यात आलेली शिक्षा कायम, कमी , वाढीव किंवा रद्द करू शकेल किंवा जेथे कोणतीही शिक्षा देण्यात आलेली नसेल तेथे शिक्षा देऊ शकेल, किंवा

(क) त्या प्रकरणाच्या परिस्थितीनुरुप त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करण्याचा निदेश देऊन ते प्रकरण, ज्याने आदेश दिला असेल त्या प्राधिकरणाकडे किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे परत पाठवू शकेल, किंवा

(ड) त्याला योग्य वाटतील असे इतर आदेश काढू शकेल :

परंतु, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला त्याला करावयाच्या प्रस्तावित शिक्षेविरुद्ध अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, कोणतेही @पुनरीक्षण प्राधिकरण, कोणतीही शिक्षा करणारा किंवा कोणत्याही शिक्षेत वाढ करणारा कोणताही आदेश काढणार नाही, आणि ज्याबाबतीत कोणतीही जबर शिक्षा द्यावयाची किंवा ज्या आदेशाचे @पुनरीक्षण करावयाचे आहे अशा आदेशाद्वारे केलेली शिक्षा वाढवून कोणतीही जबर शिक्षा करण्याचे योजिलेले असेल त्याबाबतीत या नियमांतील नियम ८ मध्ये घालून दिलेल्या पद्धतीने चौकशी करण्यात आल्याशिवाय आणि +[* * *] आवश्यक असेल त्याबाबतीत, आयोगाशी विचारविनिमय करण्यात आल्याखेरीज अशी कोणतीही शिक्षा करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की—

या नियमांतील नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणाऱ्या आदेशाविरुद्ध ज्या प्राधिकरणाकडे अपील करता येते, असे प्राधिकरण.

(एक) अपिलातील आदेश ज्याने काढला असेल ते प्राधिकरण किंवा,

(दोन) ज्या बाबतीत अपील दाखल करण्यात आलेले नसेल परंतु ज्या प्राधिकरणाकडे अपील करता आले असते असे प्राधिकरण, त्याला दुय्यम असल्याखेरीज अन्यथा, पुनरीक्षणाच्या अधिकारांचा वापर करणार नाही.

(२) @पुनरीक्षणासंबंधीची कोणतीही कार्यवाही—

---

*अधिसूचना क्रमांक सीडीआर ११८८/१५८२/सीआर ३८/८८/११, दिनांक १२ ऑक्टोबर १९९० अन्वये वगळण्यात आले.

@ अधिसूचना क्र. सीडीआर-११८४/१३८०/२७/अकरा, दिनांक १५ नोव्हेंबर १९८५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

+अधिसूचना क्रमांक सीडीआर ११८८/१५८२/सीआर. ३८/८८/११, दिनांक १२ ऑक्टोबर १९९० हा मजकूर वगळण्यात आला.

(एक) अपिलाकरिता असलेली मुदत संपेपर्यंत ,

(दोन) असे कोणतेही अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, ते निकालात काढले जाईपर्यंत, सुरू करण्यात येणार नाही.

(३) @पुनरीक्षणासाठी करण्यात आलेल्या अर्जावर, तो या नियमांखाली करण्यात आलेले अपील आहे असे मानून त्याच पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल, मात्र त्यावर विचार करण्याचा कालावधी पुनरीक्षण करावयाच्या आदेशाची प्रत अर्जदाराला देण्यात आल्याच्या तारखेपासून ६ महिने एवढा असेल.

† (२५-अ) **पुनर्विलोकन**—ज्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात यावयाचे असेल तो आदेश काढतेवेळी, जो महत्वपूर्ण पुरावा सादर करण्यात आला नव्हता किंवा जो पुरावा उपलब्ध नव्हता असा कोणताही नवीन किंवा महत्वपूर्ण पुरावा निदर्शनास आल्यावर किंवा निदर्शनास आणून देण्यात आल्यावर राज्यपाल, कोणत्याही वेळी, स्वतःहून किंवा अन्यथा, या नियमांन्वये काढलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करू शकतील :

परंतु, संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला, त्याला करावयाच्या प्रस्तावित शिक्षेविरुद्ध अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, राज्यपाल, कोणतीही शिक्षा करणारा किंवा कोणत्याही शिक्षेत वाढ करणारा कोणताही आदेश काढणार नाही किंवा नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जबर शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्याचे किंवा ज्या आदेशाचे पुनर्विलोकन करावयाचे आहे अशा आदेशाद्वारे केलेली किरकोळ शिक्षा वाढवून कोणतीही जबर शिक्षा करण्याचे योजिलेले असेल, आणि त्या प्रकरणी, नियम ८ अन्वये करावयाची चौकशी आधीच करण्यात आली नसेल त्याबाबतीत, नियम १३ च्या तरतुदींस अधीन राहून, नियम ८ मध्ये घालून दिलेल्या पद्धतीने चौकशी करण्यात आल्याशिवाय आणि आवश्यक तेथे आयोगाशी विचारविनिमय केल्याशिवाय अशी कोणतीही शिक्षा करण्यात येणार नाही.

## भाग सात—संकीर्ण

२६. **आदेश, नोटिसा इत्यादींची बजावणी.**— या नियमांन्वये देण्यात येणारा प्रत्येक आदेश, नोटीस आणि इतर आदेशिका, या संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला व्यक्तिशः देण्यात येतील किंवा त्यांच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येतील.

२७. **कालमर्यादा शिथिल करण्याचा आणि उशीर माफ करण्याचा अधिकार.**—या नियमांमध्ये स्पष्टपणे अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून या नियमांन्वये कोणताही आदेश देण्यास सक्षम

@ अधिसूचना क्र.सीडीआर-११८४/१३८०/२७/अकरा, दिनांक १५ नोव्हेंबर १९८५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† अधिसूचना क्र.सीडीआर-११८४/१३८०/२७/अकरा, दिनांक १५ नोव्हेंबर १९८५ हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

असणारे प्राधिकरण, सबळ व पुरेशा कारणांकरिता किंवा पुरेशी सबब दर्शविण्यात आली असेल तर, या नियमान्वये करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी वाढवून देऊ शकेल किंवा झालेला कोणताही विलंब माफ करू शकेल.

२८. **आयोगाच्या सल्ल्याची प्रत पुरवणे.**—या नियमांमध्ये तरतूद केल्यानुसार ज्या ज्या वेळी, आयोगाशी विचारविनिमय करण्यात येतो त्या त्या वेळी, आयोगाकडून घेतलेल्या सल्ल्याची एक प्रत आणि असा सल्ला स्वीकारण्यात आला नसेल त्यावेळी तो न स्वीकारण्याबाबतच्या कारणाचे संक्षिप्त निवेदन व आदेश देणाऱ्या प्राधिकरणाने त्या प्रकरणी काढलेल्या आदेशाची एक प्रत संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला देण्यात येईल.

२९. **निरसन आणि व्यावृत्ती.**—(१) या नियमांचा प्रारंभ झाल्यानंतर पुढे नमूद केलेले नियम, म्हणजेच---

(एक) या नियमांद्वारे तरतूद केलेल्या बाबींशी संबंधित असतील तेथवर मुंबई नागरी सेवा वर्तणूक, शिस्त व अपील नियम.

(दोन) पुनर्रचनेपूर्वीच्या मध्यप्रदेश राज्याकडून महाराष्ट्र शासनाकडे ज्यांचे वाटप करण्यात आले होते त्या महाराष्ट्र शासनाच्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांना लागू असलेले नागरी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियमांच्या नियम ५४ अन्वये तयार केलेले नियम.

(तीन) हैद्राबाद नागरी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम ज्यांना लागू होतात त्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर राजपत्रित कर्मचाऱ्यांना लागू असलेले नागरी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम.

(चार) पुनर्रचनेपूर्वीच्या हैद्राबाद राज्याकडून महाराष्ट्र शासनाकडे ज्यांचे वाटप करण्यात आले होते त्या महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना लागू असणारे हैद्राबाद नागरी सेवा (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम आणि खंड (एक), (दोन), (तीन) आणि (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नियमांसारखे असलेले व या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अमलात असलेले व हे नियम ज्यांना लागू होतात त्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे कोणतेही नियम, याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

परंतु असे की,

(अ) हे नियम निरसित केल्यामुळे देण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनांच्या किंवा आदेशांच्या पूर्वीच्या प्रवर्तनावर किंवा अशा निरसित नियमांन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींवर किंवा कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होणार नाही,

(ब) या नियमांच्या प्रारंभी, अशा निरसित नियमांखाली प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात येईल आणि अशी कार्यवाही जणू काही या नियमांखालील कार्यवाहीच आहे असे मानून शक्य असेल तेथवर, या नियमांच्या तरतूदींनुसार निकालात काढण्यात येईल.

(२) हे नियम लागू होत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, या नियमांच्या प्रारंभापूर्वी अमलात असलेले नियम, अधिसूचना किंवा आदेश याअन्वये त्यास मिळालेल्या अपिलांच्या कोणत्याही अधिकारापासून वंचित व्हावे लागेल अशा प्रकारे या नियमांमधील कोणत्याही बाबींचा अन्वयार्थ लावला जाणार नाही.

(३) या नियमांच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेल्या आदेशाविरुध्द केलेले एखादे अपील या नियमांच्या प्रारंभी प्रलंबित असेल तर, असा आदेश जणू काही या नियमांनुसार देण्यात आला होता असे मानून या नियमांनुसार त्याचा विचार करण्यात येईल आणि त्यावर आदेश देण्यात येतील.

(४) या नियमांच्या प्रारंभापासून अशा प्रारंभापूर्वी देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध केलेले एखादे अपील किंवा पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज हा, असा आदेश जणू काही या नियमांनुसार काढण्यात आला होता असे मानून दाखल किंवा सादर करण्यात येईल :

परंतु असे की, या नियमांच्या प्रारंभापूर्वी अमलात असलेल्या कोणत्याही नियमान्वये कोणतेही अपील किंवा पुनर्विलोकन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेला कोणताही कालावधी कमी होईल अशा प्रकारे या नियमांमधील कोणत्याही बाबींचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

**३०. शंकानिरसन**—कोणतेही प्राधिकरण हे दुसऱ्या कोणत्याही प्राधिकरणापेक्षा दुय्यम दर्जाचे आहे, की त्याच्या वरच्या दर्जाचे आहे अशी शंका उद्‌भवल्यास अथवा या नियमांमधील कोणत्याही तरतुदींच्या अर्थविवरणाबाबत शंका उद्‌भवल्यास सदर बाब शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्याबाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम असेल.

## जोडपत्र

(नियम २ के)

## प्रादेशिक विभाग प्रमुखांची वेळोवेळी सुधारित केलेली अनुसूची

## सामान्य प्रशासन विभाग

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई ४०० ००१.

२. राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई.

३. राज्य माहिती आयुक्त, नागपूर कार्यालय, नागपूर.

४. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद कार्यालय, औरंगाबाद.

५. राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग कार्यालय, पुणे.

६. राज्य माहिती आयुक्त,कोकण विभाग कार्यालय, नवी मुंबई.

७. राज्य माहिती आयुक्त, नाशिक विभाग कार्यालय, नाशिक.

८. राज्य माहिती आयुक्त, अमरावती विभाग कार्यालय, अमरावती.

९. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा कार्यालय, वरळी, मुंबई.

१०. संचालक (माहिती) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर/औरंगाबाद.

११. उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन, पुणे ४११ ००१.

१२. उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, औरंगाबाद ४३१ ००१.

१३. उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, नागपूर ४४० ००१.

१४. उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन, नाशिक ४२२ ००१.

१५. उप संचालक, विभागीय माहिती कार्यालय, वॉलकर कंपाऊंड, अमरावती ४४४ ६०१.

१६. वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, दादा वैद्य रोड, पणजी-गोवा ४०३ ००१.

१७. संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, ए-८, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

१८. विभागीय उप संचालक ( माहिती ), लातूर विभाग, लातूर ४३१ ५१५.

१९. विभागीय उप संचालक (माहिती), कसबा बावडा रोड, कोल्हापूर-१.

## नियोजन विभाग

१. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवी मुंबई.

२. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नाशिक.

३. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, पुणे.

४. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, औरंगाबाद.

५. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, अमरावती.

६. प्रादेशिक सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नागपूर.

## गृह विभाग

१. पोलीस उप महानिरीक्षक, लाचलुचपत विरोध व दारूबंदी, गुप्तवार्ता आणि संचालक, लाचलुचपत विरोध केंद्र, मुंबई.

२. पोलीस उप महानिरीक्षक (गुन्हा व रेल्वे), पुणे.

३. पोलीस उप महानिरीक्षक, मुंबई परिक्षेत्र (रेंज), नाशिक.

४. पोलीस उप महानिरीक्षक, पुणे परिक्षेत्र, कोल्हापूर.

५. पोलीस उप महानिरीक्षक, सशस्त्र दल, मुंबई.

६. पोलीस उप महानिरीक्षक, प्रशिक्षण व विशेष पथके, मुंबई.

७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई प्रदेश, मुंबई.

८. उप आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क (प्रशासन), मुंबई.

९. कारागृह उप महानिरीक्षक आणि उप संचालक, सुधार सेवा, पूर्व विभाग, नागपूर.

१०. कारागृह उप महानिरीक्षक आणि उप संचालक, सुधार सेवा, पश्चिम विभाग,पुणे.

११. कारागृह उप महानिरीक्षक आणि उप संचालक, सुधार सेवा, मध्य विभाग, औरंगाबाद.

१२. पोलीस उप महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.

१३. पोलीस उप महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

१४. पोलीस उप महानिरीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

१५. पोलीस उप महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

१६. पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

१७. पोलीस उप महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.

१८. विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण, मुंबई.

१९. पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.

२०. पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर.

२१. पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड.

२२. पोलीस उप महानिरीक्षक, लोहमार्ग, मुंबई.

२३. उप संचालक, सुधारसेवा, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई ४०० ००८.

२४. उप संचालक, सुधारसेवा, पश्चिम विभाग, पुणे ४११ ००६.

२५. उप संचालक, सुधारसेवा, मध्य विभाग, औरंगाबाद.

२६. उप संचालक, सुधारसेवा, पूर्व विभाग, नागपूर.

२७. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य)/मुंबई (पूर्व)/मुंबई (पश्चिम)

२८. प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

२९. प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती/कोल्हापूर/नाशिक.

३०. प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, बृहन्मुंबई, मुंबई ४०० ००१.

३१. विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे.

३२. विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे.

३३. विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

३४. विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर.

३५. उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३६. कारागृह उप महानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई ४०० ००८.

३७. कारागृह उप महानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे ४११ ००६.

३८. कारागृह उप महानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद.

३९. कारागृह उप महानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर.

(शा.म.मु.) एच ४ .८७—४ (१०,५३५—१२-०८)

४०. संचालक, न्याय सहायक, वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई.

४१. पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, औंध, पुणे ४११ ००७.

४२. अपमृत्यू निर्णेता, जे.जे.हॉस्पीटल परिसर, भायखळा, मुंबई ४०० ००८.

## सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (मुंबई), नवी मुंबई ४०० ६१४.

२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

३. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (लेखापरीक्षा),(मुंबई), नवी मुंबई ४०० ६१४.

४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षा), पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/ नागपूर.

५. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई/कोल्हापूर/लातूर.

६. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (आदिवासी), नाशिक विभाग, नाशिक.

७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखा परीक्षण), मुंबई विभाग, मुंबई.

८. प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे/औरंगाबाद/अहमदनगर/ नांदेड/अमरावती/नागपूर/कोल्हापूर.

९. प्रादेशिक उप संचालक (वस्त्रोद्योग), सोलापूर/नागपूर/औरंगाबाद/मुंबई.

१०. उप संचालक, कुटीरद्योग व उप निबंधक, औद्योगिक सहकारी संस्था, मुंबई/ पुणे/नागपूर/ औरंगाबाद.

११. उप संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय (नागपूर विभाग), नागपूर.

१२. सहायक संचालक (रेशीम), प्रादेशिक रेशीम कार्यालय (अमरावती विभाग),अमरावती

१३. सहायक संचालक (रेशीम), प्रादेशिक रेशीम कार्यालय,(पुणे व मुंबई विभाग),पुणे

१४. रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१, प्रादेशिक रेशीम कार्यालय (औरंगाबाद विभाग), औरंगाबाद

## महसूल व वन विभाग

१. मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), बोरीवली/नागपूर/नाशिक.

२. मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/पुणे/ठाणे/यवतमाळ/धुळे.

३. वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट, अमरावती.

४. मुख्य वन संरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.

५. मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), नागपूर/पुणे.

६. मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन व राष्ट्रीयीकरण), नागपूर.

७. संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. वनसंरक्षक, दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.

९. वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.

१०. वनसंरक्षक, कोल्हापूर वनवृत्त, कोल्हापूर.

११. वनसंरक्षक, (मध्यवर्ती मूल्यनिर्धारण घटक), नागपूर.

१२. वनसंरक्षक, (वन शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३. उप संचालक, भूमि अभिलेख, नागपूर/मुंबई/पुणे/औरंगाबाद.

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

१. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. शिक्षण संचालक, (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे.

४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

५. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

६. संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी), पुणे.

७. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे.

८. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, मुंबई.

९. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

१०. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.

११. विभागीय शिक्षण उप संचालक, बृहन्मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती/कोल्हापूर/लातूर.

१२. संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३. विभागीय उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, बृहन्मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती/कोल्हापूर/लातूर.

## नगरविकास विभाग

१. उप संचालक, नगररचना, मुंबई व कोकण विभाग, मुंबई.

२. उप संचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे.

३. उप संचालक, नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.

४. उप संचालक, नगररचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

५. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, कोकण विभाग, नवी मुंबई.

६. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे.

७. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नाशिक.

८. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, औरंगाबाद.

९. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, अमरावती.

१०. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नागपूर.

## वित्त विभाग

१. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

२. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

३. उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती / कोकण विभाग, नवी मुंबई.

४. उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक/ औरंगाबाद/अमरावती.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

१. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई.

२. मुख्य अभियंता, (वि.प्र.) विभाग, मुंबई.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक.

५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर.

६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद.

७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती.

८. मुख्य अभियंता (विद्युत), मुंबई.

९. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१०. अधीक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक (विद्युत) मंडळ, मुंबई.

११. अधीक्षक अभियंता, पुणे प्रादेशिक (विद्युत) मंडळ, पुणे.

१२. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक (विद्युत) मंडळ, औरंगाबाद.

१३. अधीक्षक अभियंता, नागपूर प्रादेशिक (विद्युत) मंडळ, नागपूर.

१४. अधीक्षक अभियंता (विद्युत), दर्जा नियंत्रण, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ठाणे.

१५. मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) कोकण भवन, नवी मुंबई.

**जलसंपदा विभाग**

१. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोकण प्रदेश, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ०२३.

२. अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, कोपरी, ठाणे ४०० ६०३.

३. अधीक्षक अभियंता, उत्तर कोकण, पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिंचन भवन,ठाणे-४०० ६०३.

४. अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, सिंचन भवन, ठाणे- ४०० ६०३.

५. अधीक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे मंडळ, कुवरबांव, रत्नागिरी ४१५ ६३९.

६. मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, पाटबंधारे विभाग, मुंबई ४०० ०२३.

७. अधीक्षक अभियंता, जलविद्युत मंडळ, कर्झन हाऊस, कुलाबा, मुंबई ४०० ०३९.

८. अधीक्षक अभियंता, जलविद्युत प्रकल्प सकल्पचित्र मंडळ, मसंजिद, मुंबई ४०० ००९.

९. अधीक्षक अभियंता, कोयना (विद्युत व यांत्रिकी) मंडळ, पाटबंधारे विभाग, आयोनिक (IONIC) इमारत, ५ वा मजला, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

१०. अधीक्षक अभियंता, उभारणी मंडळ, कोयनानगर, तालुका पाटण, जिल्हा सातारा.

११. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, त्र्यंबक मार्ग, नाशिक ४२२ ००२.

१२. अधीक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, नाशिक ४२२ ००२.

१३. अधीक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड, नाशिक ४२२ ००२.

१४. अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव ४२५ ००१.

१५. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद रोड, अहमदनगर.

१६. मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-०४.

१७. अधीक्षक अभियंता व सह संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-०४.

१८. मुख्य अभियंता व प्राचार्य अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक-०४.

१९. अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (विद्युत गृहे), नाशिक- ०४.

२०. अधीक्षक अभियंता (माती धरण), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक-०४.

२१. अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक-०४.

२२. अधीक्षक अभियंता (दगडी धरणे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक ४२२ ००४.

२३. अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.

२४. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे ४११०११.

२५. अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे ४११०११.

२६. अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

२७. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण मंडळ, पुणे ४११ ००१.

२८. अधीक्षक अभियंता, विशेष पृथःकरण व मुल्यांकन कक्ष, पुणे ४११ ०११.

२९. अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, वारणाली विश्रामबाग, सांगली.

३०. अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

३१. मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प) पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे ४११ ०११.

३२. अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, पुणे ४११ ०११.

३३. अधीक्षक अभियंता, कुकडी कालवे मंडळ, पुणे ४११ ००६.

३४. अधीक्षक अभियंता, भीमा प्रकल्प मंडळ, सोलापूर क्लबसमोर, सोलापूर ४१३ ००३.

३५. अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर क्लबसमोर, सोलापूर ४१३ ००३.

३६. अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कृष्णनगर, सातारा ४१५ ००३.

३७. अधीक्षक अभियंता, वारणा प्रकल्प मंडळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३.

३८. अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, येरवडा, पुणे ४११ ००६.

३९. मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११.

४०. अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, सिंचन भवन, पुणे ४११ ०११.

४१. अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, कृष्णानगर, सातारा ४१५ ००३.

४२. अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास, पुणे ४११ ००१.

४३. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद सिंचन भवन, औरंगाबाद ४३१ ००१.

४४. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, सिंचन भवन औरंगाबाद ४३१ ००१.

४५. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद ४३१ ००५.

४६. अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, उस्मानाबाद.

४७. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, नांदेड ४३१ ६०२.

४८. अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, नांदेड ४३१ ६०२.

४९. मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प), पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, औरंगाबाद ४३१ ००५.

५०. अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद ४३१ ००५.

५१. अधीक्षक अभियंता, जायकवाडी कालवा मंडळ, हायकोर्टाच्या मागे, औरंगाबाद ४३१ ००५

५२. अधीक्षक अभियंता, माजलगाव प्रकल्प मंडळ, बीड ४३१ १२२.

५३. अधीक्षक अभियंता, माजलगाव कालवा मंडळ, परळी वैजनाथ, जिल्हा बीड ४३१ ५१५.

५४. मुख्य अभियंता व संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद ४३१ ००५.

५५. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, शिवाजीनगर, अमरावती ४४४ ६०३.

५६. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, अमरावती ४४४ ६०२.

५७. अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, शिवाजीनगर कॅम्प, अमरावती ४४४ ६०२.

५८. अधीक्षक अभियंता, वर्धा पाटबंधारे मंडळ, स्टेडियमसमोर, वर्धा ४४२ ००१.

५९. अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला.

६०. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१

६१. अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, सिंचन सेवा भवन, नागपूर ४४० ००१.

६२. अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिव्हील लाईंस, नागपूर ४४० ००१.

६३. अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर ४४० ००१.

६४. अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, सिंचन सेवा भवन, नागपूर ४४० ००१.

६५. अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर.

६६. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाक्षेवि), पाटबंधारे विभाग, औरंगाबाद ४३१ ००५.

६७. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लाभक्षेत्र विकास भवन, औरंगाबाद ४३१ ००५.

६८. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जायकवाडी वसाहत, परभणी ४३१ ४०१.

६९. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पेण, जिल्हा रायगड ४०२ १०७.

७०. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर ४१४ ००१.

७१. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, "गिरणा भवन", जिल्हा पेठ, जळगाव ४२५ ००१.

७२. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर क्लब समोर, सोलापूर ४१२ ००३.

७३. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

७४. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नगर रोड, बीड ४३१ १२२.

७५. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, चैतन्य नगर, नांदेड ४३१ ६०२.

७६. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पाटबंधारे वसाहत, नागपूर ४४० ००३.

७७. प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे ४११ ०११.

७८. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र भूविकास महामंडळ, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५.

७९. मुख्य अभियंता (यांत्रिकी), पाटबंधारे विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक ४२२ ००१.

८०. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (द्वारे), सेंट्रल बिल्डिंग, पुणे ४११ ००१.

८१. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उवसं), मध्यवर्ती शासकीय इमारत, पुणे ४११ ००१.

८२. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उवसं), ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

८३. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उवसं), यांत्रिकी भवन, नांदेड ४३१ ६०२.

८४. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उवसं), वैनगंगानगर, अजनी, नागपूर ४४० ००३.

८५. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे ४०० ६०३.

८६. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नाशिक परिमंडळ, पाटबंधारे विभाग, नाशिक ४२२ ००२.

८७. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे परिमंडळ, पाटबंधारे विभाग, पुणे ४११ ०११.

८८. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पा. वि., औरंगाबाद ४३१ ००५.

८९. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, पाटबंधारे विभाग, अमरावती-३.

९०. अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नागपूर परिमंडळ, पाटबंधारे विभाग, नागपूर ४४० ००१.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

१. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, कोकण भवन, नवी मुंबई.

२. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

३. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नाशिक.

४. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, औरंगाबाद.

५. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती.

६. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नागपूर.

## सार्वजनिक आरोग्य विभाग

१. उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, मुंबई.

२. उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.

३. उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.

४. उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.

५. उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.

६. उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.

७. उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद.

८. वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, मुंबई/पुणे/नागपूर.

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

(अ) (१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

(२) अधिष्ठाता, बैरमजी जीजीभॉय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.

(३) अधिष्ठाता, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

(४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज/औरंगाबाद.

(५) अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई.

(६) अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर.

(७) अधिष्ठाता, कै. वसंतराव नाईक स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.

(८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड/नागपूर.

(९) अधिष्ठाता, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.

(१०) अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई/औरंगाबाद/नागपूर.

(११) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर/लातूर/अकोला.

(ब) (१) संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.

(२) सहायक संचालक, आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर.

(क) (१) सह आयुक्त (पुणे विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(२) सह आयुक्त (नागपूर विभाग), अन्न व औषध प्रशासन, नागपूर.

(३) सह आयुक्त (अमरावती विभाग), अन्न व औषध प्रशासन, अमरावती.

(४) सह आयुक्त (औरंगाबाद विभाग), अन्न व औषध प्रशासन, औरंगाबाद.

(५) सह आयुक्त (कोंकण विभाग), अन्न व औषध प्रशासन, ठाणे.

(६) सह आयुक्त (बृहन्मुंबई), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(७) सह आयुक्त (नाशिक विभाग), अन्न व औषध प्रशासन, नाशिक.

(८) सहायक संचालक, औषध नियंत्रण प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

१. उप संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म, प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

२. उप संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म, प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर.

३. उप संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर.

४. उप संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद.

५. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूविज्ञान आणि खनिकर्म, प्रादेशिक कार्यालय, जळगाव.

६. सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, ठाणे/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद

७. अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नागपूर.

८. सह संचालक, बाष्पके आणि धुम्र उपद्रव, आदर्श नगर, पुणे ४११ ०३७.

९. सह संचालक, बाष्पके आणि धुम्र उपद्रव, धरम पेठ, नागपूर ४४० ०१०.

१०. सह संचालक, बाष्पके आणि धुम्र उपद्रव, ऑबेराय हॉटेलसमोर, अहमदनगर ०१.

११. उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, वरळी, मुंबई ४०० ०१८.

१२. उद्योग सह संचालक, पुणे विभाग, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५.

१३. उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, सातपूर, नाशिक ४२२ ००७.

१४. उद्योग सह संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद विकास भवन, औरंगाबाद.

१५. उद्योग सह संचालक, नागपूर विभाग, नागपूर, सदर लिंक रोड, नागपूर.

१६. उद्योग सह संचालक, अमरावती विभाग, डॉ. आंबेडकर मार्ग, अमरावती.

१७. उद्योग सह संचालक, कोकण विभाग, वागळे वसाहत, ठाणे ४०० ६०४.

१८. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई ४०० ००४.

१९. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई ४०० ००४.

२०. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे ४११ ००१.

२१. व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६.

२२. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथगार भांडार, नागपूर ४४० ००१.

२३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार, कोल्हापूर ४१६ ००३.

२४. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद ४३१ ००१.

२५. व्यवस्थापक, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, वर्धा रोड, नागपूर.

२६. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई (जिल्हा सातारा) ४१२ ८०३.

२७. सहायक संचालक, शासकीय लेखनसामुग्री भांडार, पाषाण, पुणे ४११ ००८.

२८. सहायक संचालक, शासकीय लेखनसामुग्री भांडार, औरंगाबाद ४३१ ००१.

२९. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार, नागपूर ४४० ००१.

३०. अतिरिक्त कामगार आयुक्त, कोकण प्रादेशिक विभाग, मुंबई.

३१. अतिरिक्त कामगार आयुक्त, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे.

३२. कामगार उप आयुक्त, नागपूर प्रादेशिक विभाग, नागपूर.

३३. कामगार उप आयुक्त, औरंगाबाद प्रादेशिक विभाग, औरंगाबाद.

३४. कामगार उप आयुक्त, नाशिक प्रादेशिक विभाग, नाशिक.

३५. उप संचालक, राजपत्रित, वर्ग-२, प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर ४४० ००१.

**सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग**

१. विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, मुंबई.

२. विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर.

३. विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे.

४. विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

५. विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक.

६. विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती.

७. विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर.

८. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, मुंबई.

९. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर.

१०. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे.

११. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद.

१२. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक.

१३. विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती.

१४. सहायक, पुरातत्व संचालक, नागपूर/औरंगाबाद/नाशिक/पुणे.

१५. नोंदणी अधिकारी, पुरातत्व व वस्तु संग्रहालये, मुंबई/नागपूर.

१६. नोंदणी अधिकारी, पुरातत्व व वस्तु संग्रहालये, अमरावती/नाशिक.

**आदिवासी विकास विभाग**

१. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.

२. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे.

३. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक.

४. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती.

५. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर.

६. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद.

७. सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे.

**कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

१. विभागीय कृषी सह संचालक (विस्तार), नागपूर/मुंबई/पुणे/औरंगाबाद/लातूर.

२. विभागीय कृषी सह संचालक (विस्तार), कोकण प्रदेश, ठाणे/कोल्हापूर/अमरावती

३. अधीक्षक, कृषी अधिकारी, नागपूर/मुंबई/पुणे/औरंगाबाद.

४. अधीक्षक, कृषी अधिकारी, कोकण प्रदेश, ठाणे/अमरावती/लातूर.

५. अधीक्षक, फलोत्पादन अधिकारी, नागपूर/मुंबई/पुणे/औरंगाबाद/अमरावती.

६. अधीक्षक, फलोत्पादन अधिकारी, कोकण प्रदेश, ठाणे.

७. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक.

८. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, अमरावती/कोकण विभाग, नवी मुंबई.

९. प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उप संचालक, नागपूर/औरंगाबाद/नाशिक.

१०. प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उप संचालक, पुणे/अमरावती/कोकण विभाग, मुंबई.

११. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, मुंबई विभाग, गोरगाव, मुंबई-६५.

१२. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, नागपूर विभाग, नागपूर.

१३. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती.

१४. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, पुणे विभाग, पुणे.

१५. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक.

१६. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

### रोजगार व स्वयंरोजगार विभाग

१. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, कोकण विभाग, नवी मुंबई.

२. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, पुणे विभाग, पुणे.

३. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, नागपूर विभाग, नागपूर.

४. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

५. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, नाशिक विभाग, नाशिक.

६. उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार, अमरावती विभाग, अमरावती.

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

१. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

२. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे.

३. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक.

४. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

५. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

६. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

७. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, मुंबई.

८. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, पुणे.

९. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, नाशिक.

१०. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, औरंगाबाद.

११. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, नागपूर.

१२. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, अमरावती.

१३. सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई-५१.

१४. ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा वर्ग-१, पुणे ४११ ०३०.

१५. ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा वर्ग-१, नागपूर ४४० ००१.

१६. विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे.

१७. विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, मुंबई ४०० ००१.

१८. विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर/नागपूर/जळगाव/अमरावती.

१९. विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद/नांदेड.

**महिला व बालविकास विभाग**

१. संचालक, महिला व बालकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. संचालक, एकात्मिक बालविकास सेवायोजन संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.

३. जिल्हाधिकारी, रत्नागिरी/सिंधुदुर्ग एकात्मिक क्षेत्रविकास कार्यक्रम, रत्नागिरी/सिंधुदुर्ग.

४. सहायक संचालक (सकस आहार योजना), मुंबई.

५. बालविकास प्रकल्प अधिकारी (ज्येष्ठतम), पुणे/नागपूर.

६. बालविकास प्रकल्प अधिकारी, नाशिक/औरंगाबाद/अमरावती.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई